मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४९] विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र [किंमत ८ आणे

युगवाणी

संपादक : वा. ना. देशपांडे



विदर्भ साहित्य संघ, नागपूर
अनिल ग्रंथ संपदा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक ‘युगवाणी’
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा प
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ
अमरावती (वऱ्हाड).

फेब्रुवारी १९४९

अनुक्रमणिका

★

१. अत्तराचे फाये (कविता)—बी. रघुनाथ

२. दोन वृत्ति (कविता)—प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए.

३. स्वप्नभंग (कविता)—‘शिरीष’

४. डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे—वि. गो. साठये

५. वैतालीय विचार—गोविंदराव खाजगीवाले

६. महादेव भट्टकृत मराठी भाषेचें संस्कृत व्याकरण—म. दा. साठे, एम्. ए. एल्. टी.

७. भावनांचें जग (एकांकिका)—द. चिं. सोमण

८. संपादकीय

९. संघवार्ता

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

अत्तराचे फाये

त्री. रघुनाथ

जाळूनि लालसा सुखभोगांची अरुणी
आकाश उजळिलें चूड कुडीची करुनी
हे प्रभावपूजक फिरति काजव्याभोंती
काळोख ओढुनी बसतों तोंडावरती ! १

★

येतांच पत्र तें ओळखिच्या रंगाचें
वाहूनि आणि जें अंतर जड विरहिणिचें
लोचनीं घनांची क्षणांत दाटी झाली
अक्षरें कुणाच्या नकळे अश्रूंत मिटलीं ! २

★

फेंकितो महालीं रमण सखीच्या शेला
जो मावळतीच्या चुकुनि अंगणीं पडला
ही लाल चहाडी राजमंदिरीं नेली
चोरास पहाया सजल्या लाख मशाली ! ३

★

फडफडतां, गिठिंतुनि लखवग शयनीं उठुनी
छायांचें सावरि वसन कुलवती रजनी !
ण मिशे ! वाटतें अजुनि पहाट न झाली
ही असेल जाग्या सखिनेत्रांतिल लाली ! ४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोन वृत्ति

प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए.

१

फलभारें लवले पालवले नववृक्ष
टेकले भूमिवर लावुन सारें लक्ष
अनुभवी जाणता आला मालाकार
कैच्यांचा त्याने त्यांस दिला आधार ॥

२

—पण नव अननुभवी आला एक अडाणी
पाहवली नाही दाटी त्याला रानीं
हातांत घेउनी तीक्ष्ण परजली कैची
त्या नववृक्षांची केली त्याने खची ॥

●

स्वप्नभंग

"शिरीष"

स्वप्नतरंगीं स्मृतिशेषांचे उंच मनोरे उभवाया
तत्परतने सिद्ध होतसे वेडें मन्मानस वाया १

विस्मृति–सरिता अथांग वाहत रोरावत पुढती जाते
कणाकणांचें अपुरें अधुरें स्वप्न क्षणामधि ओसरतें २

सान लतेवरि अर्धोन्मीलित अस्फुट कलिका हिंदळते
स्वप्नकपोलीं भावलहरिवर भान हरपुनी बागडते; ३

घोंगावत, परि, समीर येई–पलाश व्याकुळ थरथरती
मृदुल नालिका भंग पावली; सुमन पाकळ्या ओघळती ! ४

नीलनभींच्या मंदाकिनिजाळिं विवस्त्र अवनी ही न्हाली
वासरमणिच्या सुवर्णकिरणीं केश वाळवित अन्, बसली ५

लोल–भावना रंग चितारुनि स्वप्न तिने जें रंगविलें !
अवखळ उल्कापातें अवघें निमिषांतरिं तुटलें !, सरलें ! ६

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे

विनायक गोविंद साठये

● कोल्हापूरचे कॅप्टन डॉ. श्रीखंडे हे संस्कृत काव्यांना उत्कृष्ट मराठी अनुवाद करण्यांत सिद्धहस्त आहेत. या आधुनिक 'वामन पंडिता'चा परिचय कोल्हापूरचे कवि रा. साठये यांनी या लेखांत करून दिला आहे.

★

मनोज्ञानां वाचां मृदुलमधुराणां जनयिता
सुरम्यश्लोकानां श्रवणरुचिराणां रचयिता
विशुद्ध ग्रंथानां भुवनविदितानां द्युतिमतां
जनेऽस्मिन् निर्माता कथमपिहि दैवेन भवति !

—रा. चिं. श्रीखंडे, ('वाङ्मयश्रीखंड')

बाराव्या शतकापर्यंत पुष्कळच प्रौढ व प्रगत झालेल्या मराठी भाषेंत देशाचे सारे मानवी व्यापार–व्यवहार अनाधितपणें पार पडतां येत होते, तरी स्वतंत्र ग्रंथ-लेखनाचा टिळा तिच्या भाळीं विराजमान झालेला आढळत नाहीं. ग्रंथलेखनाची भाषा संस्कृतच पाहिजे, अशी तत्कालीन विद्वानांनी पाडलेली प्रथा असंस्कृत बहुजनसमाजाला ज्ञानमंदिराकडे क्वचितच वळूं देत असे! या प्रथेच्या दुष्परिणामाचें निर्मूलन त्वरित करण्यासाठी मराठी ग्रंथलेखनालाच अट्टाहासाने वाहिलेले पहिले लेखक श्री ज्ञानेश्वर होत. अमृताशीं पैजा जिंकणाऱ्या रसिक अक्षरांचीं फुलें उधळून ज्ञानेश्वरांनी भगवंताची साक्षात् संस्कृतवाङ्मयमूर्ति जी गीता, तिची आपल्या मराठी 'ओवी'च्या सुटसुटीत साडेतीन चरणींतून जणूं प्रकट मिरवणूकच काढली ! त्या रथोत्सवाचा विशेष हा की, गीतादेवीच्या अंगोपांगीं तेथवर अखंड निगाहदारी लाभून वळावलेले बोजड संस्कृत शब्दालंकार व अर्थालंकार यांनी आपली प्रत्येक जागा मराठी साध्या लेण्यांना मोकळी करून दिली होती. हा कालोचित पालट गीतामाईलाहि आवडला असावा. ओझें उतरल्यामुळे अंमळ मोकळ्या अंगीं मराठी वाचकांतील आबालवृद्धांच्या ओळखी–देखीचें होणें तिच्या मातृहृदयाला तितकें सोपें झालें !

मराठी लेण्यांनीहि शोभून मिरवणारी गीतादेवी पाहतांच श्रीमद् भागवतांतील एकादशस्कंधालाहि आपल्या अंगींचें संस्कृत जडजोखीम कधी उतरून ठेवींनसें झालें ! त्याने नेत्रसंकेत करिताच नाथांनी आपल्या ओवीची चौपाकी मेणा सादर केली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अध्यात्मविद्येचा मराठींत सुकाळ करणाऱ्या या दोन्ही मिरवणुकांना कालेंकरून एवढें मोठें यश लाभलें की, त्यापुढे संस्कृताचे कैवारी जे मोठमोठे शास्त्री–पंडित, त्यांनीहि आपलीं शिरें नम्र केलीं. वेदान्त बोलावा, तर संस्कृतांतच, ही तेथवर उरीं बाळगलेली समजूत त्यांना पार झुगारावी लागली. इतकेंच नव्हे, तर ज्ञानेश्वरांनी प्रयत्नपूर्वक लावलेल्या मराठी भाषांतराच्या प्रथारूप वेलीला कित्येकांनी आपल्या कलमबहादुरीने महाराष्ट्राच्या आंगणीं लोकप्रियतेच्या मांडवीं यथेच्छ चढवली व पसरवलीहि. मोरोपंतांनी आपल्या ‘ आर्या ’ मालांतून भारत–भागवतांतील कथापुष्पें गोवलीं, तर वामनपंडितांनी भागवताच्या दशमस्कंधांतील श्रीकृष्णलीलेला आपल्या मराठी सुश्लोकांच्या राशींच्या राशी वाहिल्या. एवढें करूनहि, मला वाटतें, पंडितांच्या मनांतील श्रीकृष्णचरित्र गाण्याची–विशेषत: सुप्रसिद्ध भागवतोत्तम जयदेव कवींचें संस्कृतांतील ‘ गीतगोविंद ’ मराठींत अनुवादण्याची–बलीयसी वासना अपुरीच राहिली आणि कविश्रेष्ठ कालिदासाने ‘ भावस्थिराणि जनतांतर सौहृदानि ’ असें म्हटल्याप्रमाणें आधुनिक वामनपंडित, म्हणजेच ‘ सुश्लोकगोविंद ’कार श्रीखंडे, यांचा जन्म ता. ८-१-१८९९ इसवी रोजीं कोल्हापूरानजीक ‘ शेळोली ’ या निसर्गरम्य खेड्यांत झाला. आपल्या जन्मभूमीविषयीं “ खगानां मेघानां वसति ! गगनोत्तुंगशिखरे । फलैः पुष्पैः पूर्णे सुविमलपयोनिर्झरमयि ! अये दिग्देवीनां नगरि, रमणीये प्रियतमे । विशाले शैलालि, प्रसरतिहि ते कापि सुषमा ! ”

—‘ वाङ्मयश्रीखंड ’

असें किती तरी गोड जिव्हाळ्याचें वर्णन ‘ सुश्लोकां ’नी केलें आहे !

प्रस्तुत परिचयनायकांना ‘ सुश्लोककार ’ ‘ आधुनिक वामन पंडित, ’ म्हणण्याचें मला एकट्यालाच सुचलें, असें मुळीच नाही. डॉ. श्रीखंडे यांच्या ‘ सुश्लोक गोविंदा’वर आपापला अभिप्राय व्यक्त करतांना ‘ रसविमर्श’कार प्रा. वाटवे, ‘महाराष्ट्र कविचरित्र’ कर्ते आजगावकर, औंधकर राजे श्रीमंत बाळासाहेब, न्यायमूर्ति चापेकर ‘केसरी’कार–इत्यादि पाचामुखीं ही आकाशवाणी कधीच होऊन चुकली आहे ! यामुळे या परिचयलेखांत नायकाचा उल्लेख करितांना ‘ डॉ. श्रीखंडे ’ असें न म्हणतां, कधी ‘ सुश्लोक, ’ तर कधी ‘ सुश्लोककार ’ म्हणून काम भागविण्याची सवय येणें समुचितच होणार आहे. शिवाय, ‘ सुश्लोक गोविंद ’ ‘ सुश्लोक कुमार, ’ व ‘ सुश्लोक मेघ ’ (एक आगामी प्रकाशन) अशा तीन यथार्थतया सुश्लोकमय कलाकृतींच्या जनकाचा गौरव करितांना याहून वेगळी उपाधि हवीच कशाला !

सुश्लोकांनी केलेल्या संस्कृत व मराठी साहित्य वाचनाचा पसारा त्यांच्या वयाच्या व धंद्याच्या मानाने पाहतां अतिशय कौतुकास्पद, तसाच विस्मयजनक, आहे. अंगापिंडाने ते भव्य, बळकट आणि निरोगी आहेत, तसाच त्यांचा घरगुती ग्रंथसंग्रहि भव्य, बलदायक व पुष्टितुष्टिकारक आहे. त्यांना कवितेची स्वभावतःच विशेष आवड असली, तरी ते गद्यविमुख मात्र नाहीत. पद्यांत वा गद्यांत त्यांचें रचनापाटव एकाच तोलाचें आढळतें. धंद्याने ते वैद्य विद्याविशारद आहेत, पण त्यांचा कालक्षेप—

“ कदा बाणादीनां कृतिषु रचनायामपि कदा
कदाचित्संगीते नयनरुचिरे प्रेक्षणविधौ
कदाऽर्तानां सम्यग् बहुविधचिकित्सादिकरणे
कदा ध्याने शंभोर्मम मतिरहं सुष्ठु रमये ॥ ”

‘ वाङ्मय श्रीखंड ’

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशा प्रकारें, म्हणजे थोडक्यांत 'काव्यशास्त्रविनोदेन' च, होत असतो. त्यांच्या खास आवडीच्या वाचनीय ग्रंथांत श्रीमद् भागवत, वाल्मीकि रामायण, कालिदासाची सारीच कृति, आर्याभारत (पंत), तुलसीदासांचें 'श्रीरामचरितमानस' (हिंदी) इत्यादींना अग्रपूजेचा मान लाभत असतो. श्रीमद् भागवताची, विशेषत: त्यांतील श्रीकृष्णचरित्राची, त्यांची आवड जुन्या वामन पंडितांना शोभावी, इतकी पराकाष्ठेची आहे. भागवताचीं त्यांनी पारायणें केलीं नसतीं, तर 'सुश्लोककुमार' च्या प्रस्तावनेंत त्यांची त्या ग्रंथांतील अध्याय ४१ श्लोक २४-२९ चा उतारा देऊन साधलेला समर्पकपणा त्यांना क्वचित् सुचता. पार्वतीपरिणयासाठी चाललेल्या श्रीशंकराच्या वरयात्रेचें कालिदासाने 'कुमारसंभवां'त केलेलें सुंदरतम वर्णन करण्याची स्फूर्ति, कंसवधासाठी मथुरेंत प्रवेशणाऱ्या पराक्रमी बळरामकृष्णांच्या श्रीमद्भागवतांतील वर्णनामधूनच कालिदासाला झाली असली पाहिजे, असा सुश्लोककारांचा यथार्थ तर्क आहे. दशमस्कंध, अध्याय १९ यांतील २१ व्या श्लोकीं 'गोविंद दामोदर माधवेति' असा चवथा चरण आहे. त्याच वळणावर सुश्लोककारांनी आपल्या 'माधवगीतां'त 'मुकुंद नारायण माधव' अशी रम्य नामावली साधून रसाळपणाची आपली 'यमनपंक्ति' सफाई सिद्ध केली आहे. 'कृष्णगुंफा' व 'मुकुंदपूजा' या स्फुट गीताशेवटीं—

ऐशा यशोदा प्रिय नंदनाचे । लीलेसि वाखाणुनि 'राम' नाचे
श्रीकृष्णलीला मज आवडावी । त्याच्या पदीं हीं सुमनें पडावीं

× × ×

प्रभो माझी वाणी गुणगुण तुझे ती गुणगुणो ।
तुझीं गावो गाणीं विमल तव नामावलि म्हणो
मना ! गोविंदाचें स्मरण करणें विस्मरुं नको ।
मुकुंदस्थानाचा जन सरळ हा मार्ग न चुको

अशीं अनुक्रमें मागणी करणारें सुश्लोकांचें मन, तें आंग्लविद्याविभूषित, इतकेंच नव्हे, तर वैद्यविद्याविशारद आणि म्हणूनच नास्तिक, अधार्मिक प्रवृत्तिला बऱ्याच अंशीं सुलभ असूनहि ऐन तारुण्यांतसुद्धा असें ईशभक्तिप्रवण राहिलें आहे, याचें कौतुक वाटतें. त्यांना चित्रकलेचा थोडाबहुत नाद आहे. ते खेळाडू आहेत. गेल्या महायुद्धांत रणांगणीं नोकरी करून त्यांनी 'कॅप्टन' पदहि मिळविलें आहे. पितृदेवाच्या रक्षणासाठी स्वजीवित पणास लावण्यांत व प्रसंगावधान ठेवून चोरांशीं अंगसटीचें झुंज घेण्यांत सुश्लोकांनी एका मध्यरात्रीं जें शौर्य दाखविलें, त्याचें कौतुक त्यांना एक हिऱ्याची आंगठी देऊन त्यांच्या वडील बंधूंनी (कै. डॉ. शंकरराव भोसले यांनी) केलें, त्यावेळीं सुश्लोक केवळ २५ वर्षांचे होते ! सरकारांतून आता कुठे लाभलेल्या कप्तानीचें मूळ त्या चोरांच्या हातीं माथा झेललेल्या कुऱ्हाडीच्या घावांमध्ये आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे !

लष्करी पेशाला कुणा देवाने असें बावडे वरदान दिले आहे न कळे की, त्या नोकरींत शिरलेला माणूस अल्पकालांतच या--नाहीं--त्या व्यसनाच्या आहारी गेला नाही, असें बहुधा घडत नाही ! ती नोकरीच मुळांत अशी आहे की, सैनिकाला स्वजन वियोगांतच अधिकांत अधिक काळ कंठावा लागतो. कौटुंबिक जिव्हाळ्याच्या गोडीला सदैव पार मुकलेल्या जीवाला तेवढाच विरंगुळा म्हणून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आरंभी सैनिक विडीकाडीशी दोस्तीखातर म्हणून खेळूं लागतो! पण कालांतराने विस्तवाशी मांडलेला हा खेळ भलतेंच विराट रूप घेऊन कल्पनेपार धोका देतो. परंतु सुश्लोकांना लहानपणींच लागलेलें विद्याव्यसन त्यांना या लष्करी नोकरींतहि सोबत देऊन तारक ठरलें, त्याहून रसिक वाचकवर्गाला ते अधिक उपकारक ठरलें आहे. स्वजन--वियोगाच्या त्याकाळीं विदग्ध वाङ्मयाची गाढ आवड असलेल्या या अभ्यासकाला आपल्या सारख्याच विरहव्यथित यक्षाची, म्हणजेच कालिदासीय 'मेघदूतां'तील नायकाची, निरागस संगति मनोविनोदनार्थ निवडण्याचें वेळींच सुचलें आणि " नहिकल्याणकृत कश्चित् दुर्गतिं तात गच्छति " हें गीतावाक्य यथा-काल सफल झालें. मराठी 'सुश्लोक मेघा'ची ही जन्मकथा मनोरंजक आहे, तित-कीच ती अनुकरणीयहि आहे! स्वदेहाचा आटापिटा करून घेऊनहि कुणाच्या वारंवार नाकीं भिरभिरणारी, तर कुणाच्या घडोघडी तोंडी खेळून रंगणारी; तसेंच, स्वदेहाचें खुशाल अग्निदिव्य करून धूम्ररूपाने लोकांच्या नाकीं, तोंडी व माथींहि वावरणारी म्हणून जिला एका संस्कृत सुभाषितकाराने विनोदाने 'त्रिपथगे'च्या, म्हणजे त्रैलोक्यप्रिय ' गंगा ' मातेच्या, पंक्तीला बसविली आहे, ती ' तंबाखू ' कधी खास लष्करी खाकी वेषांत, तर कधी महाश्वेतेसारखी श्वेतांबराने नटून निजां-गींचा गोड परिमळ उधळीत व मादक सौंदर्याची आपल्यापरी ' शीग ' रेटत सुश्लोकांना रणांगणीं स्वजन म्हणून सेवेला हजर नव्हती, असें थोडेंच आहे ! पण त्यांच्या अंगीच्या जागत्या 'रामा'ला जिथे सुपारीसारखें एकाअर्थी ' लोकमान्य ' व्यसनसुद्धां अजून शिवूं शकलें नाही, तिथे ही कामरूपिणी शूर्पणखा झाली तरी तिचा पाड काय ?

डॉक्टरांच्या स्नेही वर्गांत स्वाभाविक अधिक भरणा डॉक्टर लोकांचाच असावयाचा. पण सुश्लोकांना हा नियम तितकासा लागू नाही, हें सिद्ध करायला प्रा. हुपरीकर, विद्याधरशास्त्री करंबळकर, सखारामशास्त्री भागवत, रंगाचार्य रड्डी शास्त्री, राजे बाळासाहेब औंधकर, न्यायमूर्ति चापेकर, रिझर्व बँकेचे शासको-त्तम सर देशमुख, केकावलि टीकाकार परांजपे, पंडित सातवळेकर इत्यादिकांशीं त्यांचा जो जिव्हाळ्याचा घरोबा आहे. तो पुरेसा आहे. सुश्लोकांना लहानपणींच कवितेचा नाद लावून तो वृद्धिंगत करण्याचें श्रेय ते आपल्या अनेक आप्तेष्टांना देत असले, तरी त्यांतला बराच मोठा भाग.

काव्यं व्यथाजाड्य मलापहारि । हृद्यं मनश्चेतननंदकारि
वाग्भूषणं कीर्तिकरं दुरापं । तस्मादृहि ते साधुरथं प्रयत्न:

असा प्रेमळ व प्रोत्साहक श्लोकबद्ध अभिप्राय देणाऱ्या त्यांच्या स्वर्गस्थ दादांच्याकडेच जातो.

आतापर्यंत उद्धृत केलेल्या संस्कृत श्लोकांवरून सुश्लोककारांच्या स्वतंत्र काव्य-शक्तीविषयीं " या संस्कृत कविता वाचतांना कविसम्राट कालिदास, भवभूति, भर्तृहरि यांच्या काव्याचा वाचकांना सारखा भास होतो " व कवीचा " जबरदस्त व्यासंग व भाषेवरील करडी हुकमत निदर्शनास येते "—असा प्रांजल अभिप्राय देणाऱ्या श्रीमंत औंधकर राजे यांच्याशीं सहमत न होणारा वाचक विरळा! या लेखांत अधूनमधून येणाऱ्या मराठी श्लोकांतून सुश्लोककारांच्या रूपाने जुने वामन पंडित वावरतांना भासतात, तसेंच, आर्यापति मोरोपंतहि वावरतांना भासतात. पाहा:—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संशय रत्नावलिने निःसंशय मोहिला असेल हरी।
उठल्या असतिल करुणावरुणालयिं लोल लहरिवर लहरी
प्राकृत भारत रचिलें यास्तव आम्ही म्हणूं तुला व्यास।
की वाल्मिकी म्हणावें रचणें रामायणींचि हव्यास!

या आर्यांतून मोरोपंत कसे हुबेहूब डोकावतात, नाही! या आर्या कधीकाळीं स्वतः पंत वाचते, तर त्यांनी आपल्याच त्या आहेत, असें म्हणायला कमी केलें नसतें!

येथवर कांही संस्कृत, तशीच, मराठी अवतरणें आपण पाहिलीं. त्यांवरून सुश्लोककार जुन्या कविश्रेष्ठांचें अनुकरण करण्यांत किती पटु आहेत, हें सहज पटण्यासारखें आहे. त्यांच्या अंगीं आता पूर्णतेस पोचलेल्या अनुवादन कौशल्याचा 'श्रीगणेशा,' माझ्या मतें, त्यांनी या अनुकरणाच्याच पानाफुलांनी केला असावा. एरवीं एवढें उदंड यश त्यांत त्यांना येणें दुर्घट आहे! वरवर पाहणारास अनुवादकांच्या अंगीं गाढ विद्वत्ता, श्रमसातत्य, अनुवाद्य विषयाचा सांगोपांग अभ्यास, दोन्ही भाषांतील चालीरीति; वाक्प्रचार आणि इतरहि आनुषंगिक मर्में जाणण्याची ऐपत असणें किती अगत्याचें असतें, हें सहज लक्ष्यांत येणार नाही. किंबहुना, भाषांतरकारांकडे कांही रसिकमन्य तुच्छतेनेहि पाहण्यास कमी करीत नाहीत! ही त्यांची चूक त्यांच्या लक्ष्यांत तेव्हाच येऊं शकेल की, जेव्हा ते स्वतःच एकाद्या संस्कृत पंक्तीचा मराठींत, अगर मराठी पंक्तीचा अन्य भाषेंत, अनुवाद करतील! स्वतंत्र पद्यरचनेंत रचनाकारास त्याचे स्वतःचे विचार मांडावयाचे असल्यामुळे पदरीं असलेल्या बहुश्रुतत्वाचा उपयोग यथेष्ट करितां येतो. पण भाषांतरकाराचें काम तेवढ्याने भागत नाही. तो शक्य तितका बहुश्रुत तर असावा लागतोच, शिवाय, त्याला परमनोव्यापाराचेंहि सूक्ष्म ज्ञान अभ्यासून पचवावें व वापरावें लागतें. थोडक्यांत म्हणजे ज्या प्रमाणांत भाषांतरकार श्रुतसंपन्न व परमनोव्यापारज्ञ असेल, त्या प्रमाणांत तो आपल्या अंगीकृत कार्यांत यशस्वी होतो. 'सुश्लोक गोविंदा' च्या प्रस्तावनेंत डॉ. श्रीखंडे यांनी भाषांतरकाराच्या अडचणींची मीमांसा केली आहे, तीहून अधिक तपशिलाची मीमांसा त्यांच्या 'सुश्लोक कुमारा' च्या प्रस्तावनेंत आहे. या साऱ्या अडचणी कौशल्यानें भागवून अनुवादकार्यांत त्यांनीं जोडलेलें यश किती श्लाघ्य, उच्च व अमोघ आहे, याचा प्रत्यय येण्यासाठी त्यांचे अनुवादग्रंथच मुळांतून वाचणें जरूर आहे.

सुश्लोकांच्या नांवांत 'राम' आहे, तसाच, त्यांच्या काव्यांतहि ठायीं ठायीं तो दृग्गोचर होतो; आणि, आता तर त्यांनी हातीं घेतलेल्या 'सुश्लोकरामचंद्र' म्हणा वा तत्सदृश अन्य नांवाने भविष्यकालीं प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांत तो मराठी वाचकांच्या चांगलाच परिचयाचा होईल. रामरावणीय युद्धांत 'शक्ति' लागून मृतप्राय झालेल्या लक्ष्मणासाठी संजीवक वनस्पतीसुद्धा द्रोणागिरी उचलून आणून रामचरणीं वाहणाऱ्या मारुतिरायाची वाहवा झाली. आपल्या श्रीमारुतिभक्तीला जागून साजेलसा पराक्रम करण्यासाठीच जणू सुश्लोकांनी देखील हिंदी महाकवि व रामभक्तोत्तम तुलसीदासजींचें प्रसिद्ध 'श्रीरामचरित मानस,' म्हणजेच तुलसीरामायण, कथाकाव्य मराठींत अनुवाद सेवेला अलिकडे घेतलें असून इतक्यांतच त्याच्या प्रथम कांडांतील एक सहस्राधिक श्लोकहि पुरे केले आहेत! येत्या ४-५ वर्षांत या ग्रंथराजाच्या रूपाने मराठी वेष धारण करून आपल्यामध्ये [illegible]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणजे वाचक महाराष्ट्राला दिव्यौषधिलाभाने लक्ष्मणाला आलें तसें नवचैतन्य जाणवेल, इतका हाहि ग्रंथ चांगला होईल, असा मला पुरा भरंवसा आहे.

महाकवि जयदेव आणि कालिदास यांच्या संस्कृत व तुलसीदासजींच्या हिंदी काव्याचे मराठींत अनुवाद करून सुश्लोककारांनी एक प्रकारें अंगिकारलेलें 'परभृतत्व' त्यांच्या कित्येक चाहत्यांना व रसिक मित्रांना विशेषसें आवडलेलें नाही. त्यांचें म्हणणें असें की, उदंड भाषाप्रभुत्व, काव्योपयोगी रस, रीति, शैली, अलंकार-इत्यादिचें समर्पक ज्ञान, तशीच, स्वतंत्र आणि समर्थ प्रतिभा पदरीं वागविणारांनी आपलें व्यक्तिमत्व पार विसरून बळेंच "परगुणपरमाणून्पर्वती" करीत बसण्यांत धन्यता ती कसली! 'लोकशिक्षणा'च्या फेब्रुवारी १९३६ च्या अंकीं विद्याभूषण पंडित बाळाचार्य खुपेरकर शास्त्री यांनी 'सुश्लोकगोविंद' व 'कुंदमाला' या ग्रंथद्वयावर आपला अभिप्राय दिला आहे. या अभिप्रायाचा समारोप "डॉ. श्रीखंडे यांनी आपली काव्यशक्ति भाषांतरासारख्या भारवाही कार्याकडे न राबवितां स्वतंत्र रचनेस वहावी"— या उग्र सूचनेने केलेला आहे. याहून पुढचें पाऊल उचलून औंधकर राजे बाळासाहेब पंत यांनी "राजारामाच्या पश्चात् मराठ्यांचा व औरंगजेबाचा संग्राम—" असा स्फूर्तिमय ऐतिहासिक काव्यविषयहि सुश्लोककारांना दिला! पण 'तटस्थः स्वानर्थात् घटयतिच मौनंच भजते' अशीच सुश्लोकांनी आपली वागणूक अजूनहि ठेवली आहे. त्यांचें म्हणणें असें की, राजसूय यज्ञांत पत्रावळी काढण्याबद्दल योगेश्वर श्रीकृष्ण मुळीच दूषणीय न ठरतां समाजवत्सलच ठरले; अर्जुनाचे घोडे चोळूनहि त्यांना त्या 'सूत'त्वाचें सोयरसुतकहि बाधूं शकत नाही, तर आपण होऊन स्वीकारलेल्या माझ्या परभृतत्वामुळे माझ्या पदरीं कोणी नसतें गौणपण बांधून थोडेंच बांधलें जाणार आहे.' उलट, जयदेवाचें भक्तिमय काव्यभांडार संस्कृत माडीच्या गडीकोठींतून काढून मराठीच्या मोकळ्या चव्हाट्यावर मला ठेवतां आलें; आतां त्या पाणपोयीवर कोणाहि प्राकृतज्ञाने आकंठ रसपान करावें आणि जयदेवाला संतोषाने धन्यवाद द्यावेत, यांतच माझें वैयक्तिक धन्यपण शिखराला खास पोचतें आहे! तारुण्यसुलभ श्रृंगारवृत्तीचें साध्य व्यक्तिगत शारीरिक भोगापुरतेंच मर्यादित नसावें. तारुण्यांत विश्वकल्याणबुद्धि जागवून व्यक्तीने स्वसुखविमुख होण्यांतच जीवितसाफल्य आहे, हें दाखविण्यासाठी "शंकरपार्वती"सारखी अत्यंत धीरोदात्त व अनुरूप गुणांची दंपती योजून कालिदासाने 'कुमारसंभव' हें ध्येयवादी संस्कृत महाकाव्य लिहिलें, याची शक्य तों चांगली जाणीव मराठी वाचकांना माझा 'सुश्लोककुमार' देऊं शकला, तर त्याला 'परभृत' म्हणून हिणवूं पाहणाराला काय म्हणावें, तें रसिक जनताच यथाकालीं ठरवील! कुठें कालिदासाचा गीर्वाणवाणगित गगनविहारी मेघ आणि कुठे भूतलवासी काव्यपिपासु प्राकृत-वाचक-चातकवृंद! या उभयतांना कांही अंशीं एकमेकांना 'हस्तप्राप्य' करून देणें माझ्या मराठी सुश्लोकमेघाला साधलें, तर त्यांत माझें कलावैशिष्ट्य मावळलें की, उजळलें म्हणायचें?"—थोड्याशा पल्लेदार विचाराअंतीं सुश्लोकांच्या मराठी साहित्याच्या समृद्धिकरणावर निष्ठावंत भर देणाऱ्या या युक्तिवादाचें अमोघत्व पटणार नाही, असा रसिक विरळा!

स्वतंत्र काव्यरचनेविषयीं सुश्लोककारांचें स्वाभाविक वैराग्य किती प्रबळ आहे, हें आपण आताच पाहिलें. त्याच तोडीचें त्यांना व्यक्तिस्तुतीचेंहि वावडें आहे. 'गीतगोविंद'कार जयदेवाने आत्मप्रौढी मिरवून कांही स्वकालीन कवींची हेटाळणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केली आहे. त्या विवक्षित श्लोकाला ‘ सुश्लोकगोविंदा ’त थारा न देण्यांत सुश्लोकांनी नम्रपणें हेंच सुचविलें आहे की, जयदेव कवीचें महाकवित्व त्याने प्रौढी मारण्यांत नसून त्याच्या कवितेच्या गुणवत्तेंत आहे. जयदेवालाहि आत्मस्तुतिविमुख ठेवण्यासाठी झटणारे सुश्लोककार त्या बाबतींत स्वत: किती निरपेक्ष असतील, हें काय वेगळें सांगितलें पाहिजे ? आत्मस्तुतीच्या फंदीं पडून कोणी कधींहि मलिन होऊं नये, असा दंडक निग्रहपूर्वक आचरण्यांत प्रकट होणारें सुश्लोकांचें सहृदयत्व, गुणज्ञांनी गुणवंतांचा यथार्थ गौरव करितांना हात कसा आणि किती सढळ ठेवावा, अगुणांचें अंगुलिपूर्वक निदर्शन करूनहि त्यांत प्रोत्साहनाचा हळुवार ओलावाहि कसा ठेवावा—इत्यादि व्यावहारिकपणांत देखील चांगलेंच कार्यकर व जागरूक आहे.

असो. सुश्लोक डॉ. श्रीखंडे यांनी आपल्या ‘ सुश्लोकगोविंदा ’दि अनुवादांना गद्यात्मक प्रस्तावना लिहिलेल्या आहेत, त्या त्यांचें गद्यावरील प्रभुत्व दाखवितात. याशिवाय, त्यांनी कांही स्वतंत्र गद्यलेखनहि केलेलें आहे. त्यांचीं ‘ कविमाधव यांची कविता, ’ ‘ काव्यविहारी यांची स्फूर्तिलहरी ’ व ‘ माधव ज्यूलिअन यांचें स्वप्नरंजन ’ हीं तीन काव्यपरीक्षणें, प्रा. अळतेकर यांच्या ‘ कालिदासाची सृष्टि ’ या ग्रंथाचें परीक्षण, ‘ कादंबिनी ’ संग्रहाची प्रस्तावना व ‘ युगवाणी ’तील ‘ विरागी ’ यांचा परिचय—या गद्यलेखनाचा आवर्जून उल्लेख करायला पाहिजे. त्यांतील ‘ स्वप्नरंजन ’ संग्रहाचें सडेतोड परीक्षण तर खूपच गाजलें !

सुश्लोक डॉ. श्रीखंडे यांचें व्यक्तिदर्शन मला करून देतां आलें तसें मीं येथवर केलें, त्यांचा दीर्घोद्योग आणि काव्यतपस्या केवढी तरी मोठी व गुणवती आहे. त्यांची प्रसिद्ध झालेली संस्कृत व मराठी स्वतंत्र कविता फारशी मोठी नसली, तरी निर्विवादपणें ती सुरस आणि उच्च प्रतीची आहे. त्यांनी मराठींत केलेल्या प्रतिकृति मूळ संस्कृत काव्यांइतक्याच प्रसन्न व उदात्त उतरल्या आहेत. असें असूनहि विशाल महाराष्ट्राला या कलावंताची असावी तितकी गाढ तर राहोच, पण उचित तीहि ओळख नाहीं, हें एक मराठी वाङ्मय-प्रपंचांतील मोठेंच गूढ आहे ! महाराष्ट्रांत कवि विपुल आहेत, तसाच महाराष्ट्रहि कलावंतांचा चाहता आहे. पण त्या चाहतेपणास इष्ट ती विशाल दृष्टि अजूनहि लाभलेली नाही, हेंच खरें ! ही व हिच्यासारखी दुसरी वस्तुस्थिति वेशीवर टांगण्यासाठी दहा वर्षांपूर्वी मिरज प्रादेशिकांनीं दक्षिण-महाराष्ट्र-साहित्य-संमेलनें भरविण्याची प्रथा पाडली. गेल्या महायुद्धाच्या वावटळींत सापडून हीं संमेलनें स्थगित न होतीं, तर हें अंतरींचें दुखणें विशाल महाराष्ट्राला कधींच कळून चुकतें ! ‘ युगवाणी ’च्या संपादकांनी हा लेख मागवून उपेक्षित दक्षिण महाराष्ट्राला आज जवळ करण्याचा जो नवा उपक्रम केला आहे, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. एका नवविवाहित दंपतीचें अभिनंदन करितांना सुश्लोकांनी म्हटलें आहे—

पुण्याय सौख्याय सुसंगमाय । ज्ञानाय वित्ताय निरामयाय
जयाय शक्त्यै यशसे प्रजायै । श्रीरामचंद्रे युवयो रति:स्यात्

या श्लेषगर्भ रचनेंत ज्या विशाल प्रेमाचें वरदान त्यांनी मागितलें आहे, तेंच विशाल महाराष्ट्राने उपेक्षित दक्षिण महाराष्ट्रीय साहित्य भक्तांविषयीं व कविजनाविषयीं यापुढे तरी जागतें ठेवावें व उभयतांनाहि फलश्रुतीचा लाभ घडू द्यावा, इतकेंच आमचें सविनय मागणें !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वैतालीय-विचार

गोविंदराव खाजगीवाले

[मागील अंकावरून समाप्त]

याशिवाय वृत्तरत्नाकराच्या निर्णयसागरीप्रतींत (१९३६) ‘ ताश्चसमेस्युर्नोनिरंतराः ’ या ऐवजी ‘ षट्चसमेस्युर्नोनिरंतराः ’ असा पाठ असून ‘ सम पादे षट्च कलाः षण्मात्राश्च निरंतरा अव्यवधाना नोस्युः । क्रमेण षड्लघवो न तिष्ठंति । किन्तु गुरुणासहित तिष्ठन्तीत्यर्थः ॥ अशी टीका रामचंद्र कविभारती यांनी केली आहे.

याप्रमाणें वरील सर्व ग्रंथांतील वचनें पाहिलीं असतां त्यांत ‘ षट्चामिश्रायुजि ’ या पिंगलसूत्राचा अर्थ करतांना हलायुध हेमचंद्र, रामचंद्र कवि भारती आणि पं. शिवेशास्त्री यांखेरीज बाकी सर्वांनी सहाऐवजीं आठ मात्रांचा विचार केला आहे. आणि वरील सूत्रांत अनुवृत्तीने येणारें न पद त्यानीं घेऊन सर्वांनी तें निषेधवाक्य मानलें आहे. रा. फफे यांनी मात्र अनुवृत्तीने येणारा नकार न मानतां तें विधिवाक्य मानलें आहे, हें दिसून येतें.

वृत्तरत्नाकरांतील वैतालीयाच्या लक्षणपद्याची रचना योग्य असलीच पाहिजे आणि त्या दृष्टीने समचरणांतील आठहि मात्रा गुरुरूप असल्या तरी चालतात, असाच अर्थ ‘ नो निरंतराः ’ याचा असला पाहिजे, या भ्रामक समजुतीने फफे यांनी पिंगल छंदःसूत्राच्या अर्थाचा विपर्यास करून हेमचंद्राची घोरपड पिंगलाच्या गळ्यांत अडकविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजेच त्यांनी पिंगल आणि हेमचंद्र यांची सम चरणांत पहिल्या आठ मात्रा गुरुरूप असल्या तरी चालतात, याविषयीं एकवाक्यता असल्याचा आभास उत्पन्न केला आहे. फफे यांनी वरील सूत्र विधिवाक्य मानून त्याचा अर्थ ‘ सम पादांत फार तर सहा लघुरूप मात्रा असतात ’ असा केला आहे. परंतु त्यांच्या म्हणण्याप्रमाणें तें सूत्र विधिवाक्य मानलें, तर त्याचा अर्थ सम पादांत सहा लघुरूप मात्रा असल्या पाहिजेत, असा होईल. आणि, मग सम पादांत चार गुरु येण्याला त्यामुळे बाध येईल. म्हणून त्यांनी ‘ फार तर ’ असा सैल शब्द वापरून पळवाट काढली आहे; परंतु निश्चित नियम सांगतांना ‘ फार तर ’ ‘ विशेष नाही ’ असले शब्द वापरणें केव्हाहि अयोग्यच. अशा सैल अर्थाचा बोध होण्याकरिता पिंगलाचार्यांनी तें सूत्र खास रचलें नसलें पाहिजे. त्यांत कांही निश्चित नियमच असला पाहिजे. असो.

आता, हलायुध-वगैरेंनी वैतालीयाचीं जीं उदाहरणें दिलीं आहेत, त्यांवरून काय बोध होतो, तें पाहूं.

हलायुधाने ३२ व्या सूत्राखाली—

१ क्षुत्क्षाम शरीरसंचया । व्यक्तीभूतशिरोऽस्थिपंजराः ।
केशैः पुरुषैस्तवारयोः । वैतालीय तनुं वितन्वते ॥ १ ॥

२ तवतन्विकटाक्षवीक्षितैः । प्रसरद्भिःश्रवणांत गोचरैः ।
विशिखैरिव तीक्ष्णकोटिभिः । प्रहतःप्राणिति दुष्करं नरः ॥ १ ॥

३ शवशोणितपंकचर्चितं । पुरुषांत्रप्रतितोर्ध्वमूर्धजं ।
वपुरातपवन्हि दीपितं । वैतालीयमिदंविलोक्यताम् ॥ १ ॥

अशीं तीन उदाहरणें दिलीं असून ३६ व्या सूत्राखालीं—

४ समरशिरसिसह्यते द्विपां । नवनिशितायुधवृष्टिरप्रत: ।
कुवलयदीर्घचक्षुषां । प्रमदानां न कटाक्ष वीक्षिते ॥ १ ॥

असें उदाहरण दिलें आहे. आणि, छंदोनुशासनांत—

५ अधुनाभवदीयवैरिणा । मटवीकोटरचारिणांनृप ।
प्रतिभातितृषांध चेतसां । वैतालीयरस:सुधोपम: ॥ १ ॥

असें उदाहरण दिलें आहे. आणि, पं. शिंत्रेशास्त्री यांनी—

६ वंदन हें भारतीपदा । मम संतत हरिजे निजापदा ।
कविवृंद यदीय चिंतनें । मतिजाड्यादि लयास शीघ्रनें ॥ १ ॥

असें स्वकृत उदाहरण दिलें आहे. कारण मराठी भाषेंत आतापर्यंत या जातींत रचना झालेली नाही. या जातीचा वृत्तत्व पावलेला वियोगिनी म्हणून जो प्रकार आहे, त्यामध्ये मराटींत थोडी रचना आढळते. वियोगिनी वृत्ताला वैतालीय असेंहि म्हणतात. अपरवक्त्र म्हणून वैतालीयाचा वृत्तत्व पावलेला दुसरा प्रकार संस्कृतांत आहे. त्यांतहि मराठीमध्ये रचना आढळून येत नाही. वरील हलायुधाने दिलेल्या उदाहरणांपैकीं 'तवतन्विकटाक्ष' हा श्लोक वियोगिनी वृत्तांतील आहे आणि अपरवक्त्राचें उदाहरण शाकुंतलांत अंक ४ श्लोक ९ येथे आहे, तें—

७ अनुमत गमना शकुंतला । तरुभिरियंवनवासबंधुभि: ।
परभृतविरुतं कलं यथा । प्रतिवचनीकृत मे भिरीदृशं ॥ १ ॥

याप्रमाणें वैतालीयाच्या वरील सर्व उदाहरणांवरून समचरणांतील आठ मात्रां-विषयीं नियम दिसून येतात ते—

१ आठ मात्रांमध्ये ओळीने सहा लघुमात्रा नसाव्या.

२ पहिल्या सहा मात्रा अमिश्र नसाव्या, म्हणजेच मिश्र असाव्या. मिश्र म्हणजे गुरु किंवा लघुगुरुमिश्रित.

३ सातवी व आठवी या मात्रा लघुच असाव्या.

वरीलपैकीं पहिला नियम सर्वांना मान्य आहेच. आणि दुसऱ्या नियमाचा उल्लेख पं. शिंत्रेशास्त्री यांनी केला असून तो हलायुध व हेमचंद्र यांना मान्य असल्याचें त्यांच्या वर दिलेल्या उदाहरणांवरून दिसून येतें. तिसरा नियम मात्र कोणी सांगितलेला नाही. परंतु तोहि हलायुध, हेमचंद्र आणि पं. शिंत्रेशास्त्री यांच्या वर दिलेल्या उदाहरणांवरून स्पष्टपणें दिसून येतो. शिवाय वैतालीयाच्या अपरवक्त्र व वियोगिनी या प्रकारांतहि सातवी व आठवी या मात्रा लघुच असाव्या लागतात. इतकेंच नाही, तर वैतालीयाच्या औपच्छंदसिक वगैरे भेदांतहि—चारुहासिनीखेरीज सम चरणांतील सातवी व आठवी या मात्रा लघुच असाव्या लागतात. (चारुहासिनीमध्ये सातवी व व आठवी मात्रा मिळून गुरु का असावी लागते, याचा विचार स्वतंत्र करणें बरें.) तेव्हा वरील सर्व टिकाणीं सातवी व आठवी या मात्रा लघुच का असतात, याचा

 विचार करतां त्याचें कारण छंद:शास्त्राचें मूलतत्त्व जे उच्चारणसौकर्य तेंच आहे, असें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वच्छ दिसून येतें. ३६ व्या सूत्रावर टीका करतांना तेथे त्यांतील चकारामुळे न या पदाची अनुवृत्ति होते, हें स्पष्ट असल्याने तसा उल्लेख न करतांच हलायुधाने तें सूत्र निषेधार्थी मानलें आहे. त्याचप्रमाणें, सातवी व आठवी या मात्रा लघुरूपच असाव्या, असें सूत्रार्थावरून त्याला स्पष्ट वाटत असल्यामुळे त्याने तसा खुलासा केला नसावा.

हेमचंद्रानेंहि वरील सूत्रावर हलायुधाप्रमाणेंच टीका केली असून उदाहरणहि हलायुधाप्रमाणें समचरणांतील सातवी व आठवी मात्रा लघु असलेलेंच दिलें आहे. परंतु त्याने आठ मात्रांच्या प्रस्ताराने होणारे जे तेरा विकल्प सांगितले आहेत, त्यावरून त्याला सातवी व आठवी या मात्रा लघूच असाव्या ही कल्पना नसावी, असें दिसतें. आणि त्या सर्व विकल्पांचें छांदस पद्धतीने उच्चारण करतां येईल की नाही याचा विचारहि त्याने केलेला नसावा. एकंदरींत तो गणिती दिसतो. वैतालीयाच्या सम चरणांतील सातवी व आठवी मात्रा गुरु असेल, तर उच्चारणाला अडथळा येतो, हे अनुभवाने ज्ञात्यांच्या ध्यानीं येणार आहे, म्हणून हेमचंद्राने सांगितलेल्या तेरा विकल्पांपैकीं पहिले सात त्याज्यच ठरतात. सात स्वरांच्या प्रस्ताराने हजारों राग उत्पन्न होतील, असें गणिताने म्हणतां येतें. परंतु उच्चारणाच्या दृष्टीने उपयुक्त असे त्यांतील थोडेच प्रकार प्रत्यक्षांत असतात. एकेका वृत्तापासून कोटिकोटि प्रकार निर्माण होतील, असें शास्त्रकार सांगतात. परंतु प्रत्यक्षांत त्यांतील पाच चार प्रकारहि आढळून येत नाहीत. याचें कारण केवळ गणिताने होणारे प्रकार उच्चारणक्षम ठरत नाहींत, हेंच होय. परंतु हेमचंद्राने केलेल्या घोटाळ्यामुळे केदारभट्टाच्या मनांत विकल्प उत्पन्न झाला. आणि त्याचें निराकरण त्याने मोठ्या युक्तीने केलें! त्याने टीका केली हेमचंद्राप्रमाणें आणि उदाहरण दिलें त्याच्या विकल्पाप्रमाणें! असें त्यानें दुटप्पी कार्य साधलें! म्हणजे त्यावरून वाटेल त्याने वाटेल तसा अर्थ करावा. गंगादास आणि लेले शास्त्री यांनी केदारभट्टांचा केवळ अनुवाद केला आहे, इतकेंच. छंदोरचनेंत त्यांतील पद्धतीप्रमाणें चमत्कारिक विवेचन केलेलें आहे. वैद्य आणि आपटे दोघे कोशकार आहेत, छंदःशास्त्रज्ञ नव्हेत. म्हणून त्यांच्या म्हणण्याविषयीं विशेष विचार करण्याचें कारण नाही. असो.

तेव्हा 'षट्चामिश्रायुजि' (न) या पिंगलसूत्राचा अर्थ काय आहे; हेंच नीट पाहिलें पाहिजे. आणि, समचरणांतील सातवी व आठवी या मात्रा लघुच असल्या पाहिजेत, असा अर्थ या सूत्राचा आहे की काय, याचा विचार करतां 'प्रसक्तस्यैव-निषेध:' या न्यायशास्त्रांतील वचनाप्रमाणें समपादांतील पहिल्या सहा मात्रा अमिश्र नसाव्या, म्हणजेच त्यापुढील दोन सातवी व आठवी या मात्रा अमिश्र असाव्या, असाच वरील सूत्राचा निश्चित अर्थ आहे, हें स्पष्ट दिसून येतें.

म्हणजे, 'षट्चामिश्रायुजि' या सूत्रावरून

१ समपादांतील पहिल्या सहा मात्रा गुरु किंवा लघुगुरुमिश्रित असाव्या.

२ सातवी व आठवी या मात्रा लघु असाव्या.

३ आठ मात्रांत ओळीने सहा लघुमात्रा नसाव्या.

याप्रमाणें नियम ठरतात. वरील एकंदर विवेचनावरून सिद्ध होतें कीं,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

' वैतालीय पद्यप्रकाराला चार चरण असतात. विषम चरणांत प्रथम सहा मात्रा आणि सम चरणांत प्रथम आठ मात्रा असून त्यापुढे र, ल, ग असे गण येतात. सम विषम चरणाच्या पहिल्या सहा व आठ मात्रांतील सम मात्रा पुढील विषम मात्रेशी संयुक्त असूं नयेत विषम चरणांतील सहा मात्रा लघु, गुरु किंवा लघुगुरुमिश्र कशाहि असल्या तरी चालतात. आणि सम चरणांतील पहिल्या सहा मात्रा गुरु किंवा लघुगुरुमिश्र अशा असाव्या. सातवी व आठवी या मात्रा लघुच असाव्या. आणि आठ मात्रांत ओळीने सहा लघुमात्रा नसाव्या, असें वैतालीयाचें पिंगल-छंदःसूत्राप्रमाणें लक्षण ठरतें. आणि लेखारंभीं मात्रागणांनीं दिलेल्या वैतालीयाच्या लक्षणांत वरील सर्व नियमांचा अंतर्भाव होतो. निराळे नियम सांगण्याचें कारणच राहात नाही.

छांदस जातींचे—मात्राछंदांचें-लक्षण मात्रागण, अक्षरगण आणि लघुगुरु यांच्या मिश्रणाने सांगणें केव्हांहि अयोग्यच होय.

वरील विवेचनावरून फफे यांनीं केलेला पिंगलसूत्राचा अर्थ व पिंगलमताप्रमाणें म्हणून दिलेलें वैतालीयाचें लक्षण हीं दोन्ही चुकीचीं आहेत; आणि म्हणून त्यांनीं माझ्या वैतालीयाच्या लक्षणावर घेतलेला अव्याप्तीचा आक्षेप योग्य नसून त्यांनी दिलेलें लक्षणच अतिव्याप्त आहे, हें दिसून येतें.

' सह्याद्रि'मधील लेखांत केदार भट्ट व लेले शास्त्री यांचीं उदाहरणें न घेतां मी पं. चित्रेशास्त्री यांचें उदाहरण दिलें आहे, याचें कारणहि तेंच आहे. असो.

वरील एकंदर विवेचनावरून वैतालीयाविषयीं माझें निश्चित मत काय आहे, तें ध्यानीं येईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महादेवभट्टकृत मराठी भाषेचें संस्कृत व्याकरण

महादेव दामोदर साठे, एम्. ए., एल्. टी.

● पुण्याचे रा. साठे यांना ‘ सापडलेल्या ’ मराठीच्या एका संस्कृत व्याकरणाचा अल्प परिचय या लेखांत त्यांनी करून दिला आहे.

या लेखांत कित्येक स्थळीं संशोधकांना सूक्ष्म चिमटे घेण्यांत आले आहेत, असेंहि कदाचित् कुणाला वाटण्याचा संभव आहे !

✶

काय अपूर्व योगायोग ! शिवाजीच्या जन्मतिथीसारखा अस्मादिकांच्या जन्म-तिथीचा वाद होऊं नये, म्हणून माझ्या जन्मकुंडलीच्या शोधार्थ मीं माळ्यावरील आमचीं जुनीं दप्तरें धुंडाळलीं. त्यांत शेकडो पोथ्या कसरीने अर्ध्यामुर्ध्या खाल्लेल्या अशा आढळल्या ! कोण ही आमची अनास्था ! पोथ्यांतील मोत्यासारखें एकटाकी अक्षर पाहून तर माझा पूर्वजांबद्दलचा आदर दुणावला !

याच गळाठ्यांत मला वरील मथळ्याचा एक संपूर्ण ग्रंथ सापडला. इतिहासा-चार्य राजवाडे यांस तंजावरला ‘ राधामाधवविलास ’ हा संस्कृत ग्रंथ सापडल्यामुळे जितका आनंद झाला असेल, तितकाच आनंद मला हा ग्रंथ पाहून झाला ! ग्रंथ आधाशीपणाने चाळला, पण त्यांत कर्त्याच्या नांवाखेरीज त्याची जास्त माहिती मिळाली नाही ! यामुळे मला फार वाईट वाटलें असलें पाहिजे, हें काय सांगायला हवें !

पण समग्र ग्रंथ वाचून अंतर्गत पुरावा कांहीतरी सांपडेल, म्हणून सूक्ष्म अभ्यास सुरू केला. संशोधनाच्या वेगवेगळ्या पद्धती अभ्यासिल्या. महाभारताच्या संशोधनाच्या बाबतींत ‘ सह्याद्रींत ’ येऊन गेलेला केळकर–वेलवलकर–वादहि नजरे-खालून घातला. अक्षर व टिकांचे नमुने पाहून कालनिर्णय करतां येतो का, पाहिलें. पृष्ठमात्रा नसल्यामुळे ग्रंथ फार जुना नाही, हें सिद्ध झालें. अप्रसिद्ध व अप्रकाशित संस्कृत ग्रंथांचे कॅटलॉग्ज् पाहून त्यांत अशा मजकुराचा किंवा नांवाचा ग्रंथ आहे की काय, याची खात्री करून घेतली. पण ह्या अपूर्व ग्रंथाचा उल्लेख कोठेहि आढळला नाही ! मला आश्चर्य वाटलें तें हेंच की, हा ग्रंथ आमच्या माळ्यावर कसा आला ? त्यावर पुसट सुद्धा शक, तिथि व वार नाही. तसें असतें तर डॉ. हर्षे यांच्याप्रमाणें तो पुसट आकडा निश्चित करण्याचा प्रयत्न केला असता ! ज्ञानेश्वरीच्या पोथींत १ × ७५ असा शक होता. तो १२७५ की १५७५ अशी शंका तरी घेतां आली. पण या पोथींत तो शक अभावानेच दिसूं लागला !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांही असो, आज अनेक पिढ्या हा अपूर्व ग्रंथ पुरून ठेवलेल्या संपत्तीप्रमाणें अज्ञातावस्थेंतच होता, एवढें खरं.

या पोथींतील पानांचा आकार ९" × ४" असून प्रत्येक पानांत ११-१२ ओळी आहेत व प्रत्येक ओळींत सुमारें पन्नास अक्षरं आहेत. पोथी जीर्ण असून तींतील पानें चिकटलेलीं होतीं, तीं वाफेवर धरून अलग करण्यांत आलीं. हें व्याकरण थेट पाणिनीच्या अष्टाध्यायींतील सूत्राप्रमाणें सूत्रबद्ध आहे; व कांही ठिकाणीं अर्थ स्पष्ट करण्यासाठी 'वृत्ति' पण दिली आहे. पोथींत सूत्रें लाल शाईंत आहेत, तर 'वृत्ति' काळ्या शाईंत आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीवर कात्यायनानें जशीं 'वार्तिकें' लिहिलीं, तशीं कांही स्थलीं वार्तिकेंहि आढळून येतात. पण या वार्तिककाराचें नांव दिसून येत नाही. या व्याकरणाचे आठ अध्याय असून प्रत्येक अध्यायाचे चार 'पाद' आहेत. तात्पर्य, पाणिनीबरहुकूम सर्व ग्रंथाची रचना आहे. पाणिनीनें ज्याप्रमाणें सपाद-सप्ताध्यायीं प्रति त्रिपादी असिद्धा। त्रिपाद्यामपि पूर्वंप्रति परं असिद्धम्' हें "पूर्वत्रासिद्धम् ८।२।१" या सूत्रानें सांगितलें, तीच सरणी महादेवभट्टानेंहि स्वीकारिली आहे. इतकेंच काय, पण 'इत्' संज्ञा, कर्मप्रवचनीय, प्रातिपदिक, कारकविभक्ति, प्रत्याहार, वगैरे परिभाषाहि तशाच उचलल्या आहेत. तात्पर्य, महादेवभट्टांनी मराठी व्याकरणाचे 'पाणिनि' होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली असावी, असें स्पष्ट दिसतें !

पहिल्यानें मंगलाचरण देऊन प्राचीन ग्रंथकारांची परंपरा त्यानें चालविलेली दिसते. ग्रंथास सुरवात अशी आहे—

नत्वा सरस्वतीं देवीं प्रणिपत्य पुनः पुनः।
महादेवेन भट्टेन कौमुदियं विरच्यते ॥ १ ॥
नत्वा विश्वेश्वरं साम्ब कृत्वाच गुरुवन्दनम्।
बालानां सुख बोधाय × × × × × × (२)
मुनित्रयं नमस्कृत्य तदुक्ती: परिभाव्यच।
वैयाकरण-सिद्धांत-कौमुदीयं विरच्यते ॥ (३)

वृत्तिः—व्याकरणम् अधीयते विदन्ति वा वैयाकरणाः। तत्सिद्धांतानां कौमुदी नाम प्रकाशिका इत्यर्थः। मुनित्रयं नाम पाणिनिः कात्यायनः पतञ्जलिश्च। तेषाम् उक्ती: नाम सूत्र वार्तिक भाष्याणीत्यर्थः। 'परिभाव्य' नाम पर्यालोच्य इति। इयं 'कौमुदी' चन्द्रिका वा बालानां सुख बोधाय भवेत् इत्याकांक्षया रचिता। ×××

अर्थः—देवी सरस्वतीला नमस्कार करून व पुनः पुनः वंदन करून महादेव-भट्ट (मराठी व्याकरणाची) ही 'कौमुदी' रचित आहे. अंबेसह शंकराला नमन करून व गुरुचरणांना वंदन करून बालांना व्याकरणाचा बोध सुखानें अल्पायासानें व्हावा, एतदर्थ-(पुढील अक्षरें पुसटलीं आहेत.) तीन मुनींना (पाणिनि, कात्यायन व पतंजलि) नमस्कार करून त्यांनीं केलेलीं सूत्रें (पाणिनि), वार्तिकें (कात्यायन) व भाष्य (पतंजलि) यांचें पर्यालोचन करून जे आज पावेतों वैयाकरण (म्हणजे जे व्याकरण शिकतात, अथवा जाणतात) झाले, त्यांच्या सिद्धांतावर प्रकाश पाडणारा हा ग्रंथ आहे.

आता, कांही सूत्रें उद्धृत करतों,

आदर इत्यधिकारः।

 सूत्रः— अकारान्तेभ्यो रावद्। २। १। २३

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वृत्तिः— अकारान्तेभ्यः शब्देभ्यः रावट् प्रत्ययः स्यात् । टकारस्तु इत्संज्ञकः । यथा गोविंदराव शंकरराव इत्यादि । किंतु 'महादेव' शब्दस्यतु रावटि 'माधव' इत्यादेशः उच्चार सौकर्यात् । यथा माधवराव ।

अर्थः— 'आदर' दाखविणारे म्हणजे त्या अर्थी प्रत्यय सांगणारीं सूत्रें यापुढे आहेत.

शब्द म्हणजे विशेषनाम अकारान्त असल्यास आदरार्थी 'रावट्' प्रत्यय लावावा. यांतील टकार हा इत्संज्ञक असल्यामुळे त्याचा लोप होतो. जसें, गोविंदराव शंकरराव इत्यादि. पण 'महादेव' यापुढे रावट् प्रत्यय लावते वेळीं उच्चार-सौकर्यासाठी 'माधव' असा आदेश करावा. जसें, महादेव+राव=माधवराव.

सूत्रः—ओः पंते गुणोऽविष्णोः। २ | १—२४

वृत्तिः—उकारान्तेभ्यः शब्देभ्यः आदरार्थे पंत प्रत्ययः स्यात् गुणश्च। नतु विष्णोः। यथा धोंडोपंतः, गुंडोपंतः। अविष्णोः इति किम्। यथा विष्णुपंतः।

अर्थः—विशेषनाम जर उकारान्त असेल, तर त्यापुढे आदरार्थी 'पंत' प्रत्यय लावावा व गुण करावा. पण याला अपवाद 'विष्णु.' जसें, धोंडोपंत, गुंडोपंत. धोंडु व गुंडु हे शब्द उकारान्त असल्यामुळे 'पंत' प्रत्यय लागून मागील 'उ'चा गुण होऊन 'ओ' झाला व धोंडोपंत, गुंडोपंत अशीं रूपें सिद्ध झालीं' परंतु 'विष्णु' शब्द अपवाद असल्यामुळे गुण झाला नाही, म्हणून 'विष्णोपंत' असें रूप न होतां 'विष्णुपंत' च रूप होतें.

सूत्रः—अतर्पिग्भ्यां दाणिट्। १ | ३ | ३४.

वृत्तिः—अतर पिक् शब्दाभ्यां दाणिट् प्रत्ययः स्यात्। यथा अतर्दाणी, पिग्दाणी।

वार्तिकः—अत्तरादिभ्य इति वक्तव्यम्। अत्तरस्तु आकृतिगणः। यथा गुडदाणी, चहादाणी, मच्छरदाणी, एकदाणी इत्यादिः

अर्थः—अत्तर आणि पिक् या शब्दापुढे 'दाणि' प्रत्यय लावून शब्दसिद्धी करावी. जसें—अतर्दाणी, पिगदाणी इत्यादि.

यावर पुढील 'वार्तिक' आहेः—अतर आणि पिक् एवढे दोनच शब्द न घेतां 'अत्तरादि' म्हणावें. म्हणजे अतर शब्दाप्रमाणे दुसरेसुद्धा. जसें, गुडदाणी, चहादाणी, मच्छरदाणी, एकदाणी इत्यादि.

अशीं सर्वच सूत्रें येथें देण्याचा विचार नाही.

मंगलाचरणांतील श्लोकांवरून असें दिसतें की, हा महादेवभट्ट शैव असावा. प्रथम त्याने विघ्नविघातासाठी ग्रंथ पूर्ण व्हावा, म्हणून शारदादेवीला वंदन केलें आहे व यांतच स्वतःचें नांव 'महादेवेन भट्टेन' अशा रीतीने उल्लेखिलें आहे. सर्वांत आश्चर्य म्हणजे बालांच्या सुखबोधासाठी मराठी व्याकरण संस्कृतांत हा महादेवभट्ट रचीत आहे! मला वाटतें, त्यावेळीं पाणिनीच्या अष्टाध्यायीचा व त्यावर भट्टोजी दीक्षिताने लिहिलेल्या 'सिद्धांतकौमुदी' टीकेचा अभ्यास सर्रास चालू असला पाहिजे. म्हणजे काय की, संस्कृताचें अध्ययन घरोघरीं होत असलें पाहिजे. म्हणून महादेव भट्टाला वाटलें असावें की, आपण जर सूत्र-बद्ध मराठीचें व्याकरण लिहिलें, तर बालांना सुखाने बोध होईल!

तिसरा श्लोक तर त्याने भट्टोजी दीक्षिताच्या 'सिद्धांत कौमुदीं'तून जसाच्या तसाच घेतलेला दिसतो. त्यांत संस्कृत व्याकरणाचे जे प्रसिद्ध तीन मुनि पाणिनि, कात्यायन व पतंजलि त्यांचें आदरपूर्वक स्मरण करून आपल्या ग्रंथालाहि त्याने 'कौमुदी' नांव दिलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उद्धृत केलेल्या सूत्रांवरून निघणारीं अनुमानें:— अतर पिग्भ्यां दाणि १ । ३ । ३४— हें सूत्र घेऊं या. यांत ग्रंथकाराने फक्त 'अतर्दाणी' व 'पिगदाणी' या दोन शब्दांची व्युत्पत्ति दिली. तेव्हा 'दाणी' प्रत्ययांत इतर शब्द त्या वेळच्या मराठी भाषेंत रूढ झाले नसले पाहिजेत. 'चहादाणी' वगैरे शब्द वार्तिककाराला वार्तिक करून साधून घ्यावे लागले. यावरून असें अनुमान निघतें की, महादेव-भट्टाच्या काळीं महाराष्ट्रांत तरी चहाचें आगमन झालें नसलें पाहिजे. 'एकदाणी' हा स्त्रियांचा अलंकार त्यावेळीं नव्हता. 'मच्छरदाणी' नसल्यामुळे डासांचा त्रास नसावा व 'गुडदाणी शब्द सध्या आहे या स्वरूपांत नसावा. वास्तविक 'गुडदाणी' यांत जरी अंतीं 'दाणी' असें आहे, तरी तो 'धाना' शब्दापासून झाला असावा. कारण मूळ संस्कृत व्युत्पत्ति "गुडामिश्रिता: धाना: गुडधाना:" असा मध्यम-पदलोपी समास होऊन तो शब्द झाला आहे. भाषेंत 'गुडधाना' याचें मराठींतलें रूप 'गुडदाणी' महादेवभट्टाच्या कालांत नंतरचें असावे असें अनुमान निघतें.

ग्रंथकार 'अत्तर' असा शब्दप्रयोग न करतां 'अतर' असा करतो. आता, संयुक्त-व्यंजन-रहित 'अतर', 'पता' हे शब्द उत्तर हिंदुस्थानांत अजूनहि रूढ आहेत. उदाहरणार्थ, 'मुझे अतर लगाव.' 'उसका पता मुझे मालूम नहीं.' तात्पर्य, महादेवभट्ट हा उत्तर हिंदुस्थानांत काशीक्षेत्रीं किंवा अन्यत्र बरेच दिवस अध्ययनासाठीं राहिला असावा. त्यामुळे सूत्रांत 'अतर' असा एकेरी शब्दप्रयोग त्याने केला आहे.

शिवाय 'अतरदाणी' व 'पिगदाणी' हे दोनच शब्द सूत्रांत असल्याने पान-तंबाखूचें व्यसन व अत्तराचा शोक मोठ्या प्रमाणांत असला पाहिजे, हें सिद्ध होतें. सर्वांत आश्चर्य म्हणजे 'गुलाबदाणी' शब्द हा कसा नजरेंतून सुटला ! पुढे तो 'अत्तरादिभ्य इति वक्तव्यम्' या वार्तिकाने साधून घ्यावा लागला.

वर फक्त तीनच सूत्रें दिलीं आहेत व त्यांवरून निघणाऱ्या अनुमानांचें मीं दिग्दर्शन केलें आहे. सर्वच ग्रंथ अपूर्व आहे व त्याचें संशोधन करून त्यावेळच्या महाराष्ट्राच्या इतिहासावर बराच प्रकाश पडणार आहे. मराठे हे 'आयुधजीवी' होते, असा स्पष्ट उल्लेख एका सूत्रांत आहे, तर महाराष्ट्रांतील स्त्रियाच फक्त आपल्या वसनाला (नेसण्याला) कच्छ घालतात, असाहि उल्लेख आहे. आमचे मित्र प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांच्या नजरेखालीं जर हा ग्रंथ आला असता, तर त्यांना अनेक शब्दांची व्युत्पत्ति वेगळीच द्यावी लागली असती !

शेवटीं ग्रंथांत दोष राहणें शक्य आहे, पण सदय हृदयाचे सज्जन क्षमा करतीलच, अशा आशयाचा श्लोक आहे, तो असा:—

प्रमादोमेऽवश्यं भवति मतिमान्द्यादलसत: ।
पदार्थन्यायानामपि दुरवगाहत्वनियमात् ।
परं त्वन्त: सन्त: सदयहृदया ईशमहिमा ।
प्यपूर्वस्तस्मान्मे न खलु खलपापोभयभयम् ।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावनांचें जग

मूळ लेखक—डब्ल्यू. बी. यीट्स
अनुवादक—द. चिं. सोमण

इ. स. १९२३ मध्ये वाङ्मयाचें 'नोबेल' पारितोषक मिळविणारे आयरिश कविश्रेष्ठ वुइल्यम् बटलर यीट्स (१८६५-१९३९) यांच्या एका उत्कृष्ट एकांकिकेचा हा सरस अनुवाद सत्कवि सोमण यांनी केला आहे. गूढ, काव्यमय पार्श्वभूमीवर वास्तवतेच्या सीमारेषा अगदी अस्पष्ट अशा, नाजूक हलक्या हाताने रेखाटायच्या हें यीट्सचें वैशिष्ठ्य. अर्थात् 'सूचकता' हा त्यांच्या साऱ्या लेखनाचा प्राण आहे, यांत आश्चर्य नाही.

एकांकिकेंतील पात्रें आयर्लंडमधील 'गॅलिक' भाषेंत बोलत आहेत, असें समजायचें! मूळ पद्यांत असूनहि अनुवाद गद्यांत केलेला आहे.

पात्रें:—

मार्टिन ब्रुईन— बाप.
शॉन ब्रुईन— मुलगा
फादर हार्ट— धर्मोपदेशक.
ब्रिजेट ब्रुईन— आई.
मेरी ब्रुईन— सून.

शिवाय एक लहान सुस्वरूप मुलगी. ही 'परी' आहे.

[काल--अठराव्या शतकाचा उत्तरार्ध. स्थळ--आयर्लंडमधील स्लिगो काऊंटीतील ब्रुईन कुटुंबाच्या घरामधील स्वयंपाकघर. खोलीच्या डावीकडील भिंतीमधल्या शेगडींत लाकडाऐवजीं वाळलेलें गवत जळत आहे. शेकडीसमोर एक टेबल आहे. पाठीमागील भिंतींत एक दार असून त्यांतून एकदम घराबाहेर पडतां येतें. या दरवाज्याच्या डावीकडेहि एक दरवाजा असून त्यांतून दुसऱ्या खोलींत जातां येतें. स्वयंपाक घराला एकच खिडकी असून खोलीच्या उजव्या बाजूस एक कोच व एक मोठें कपाट आहे. खिडकीच्या धक्क्यावर एका मोठ्या पसरट पितळी भांड्यांत बरीचशीं ताजीं गुलाबाचीं फुलें ठेवलेलीं आहेत. मार्टिन, फादर हार्ट आणि ब्रिजेट टेबलाजवळ बसलेलीं असून शॉन जेवणाकरिता टेबलावर खाद्यपदार्थ मांडीत आहे. मेरी कोचावर एक पिवळट रंगाचें पुस्तक वाचीत बसलेली आहे. हें पुस्तक हस्तलिखित आहे.]

ब्रिजेट—मनसोक्त चालूं आहे वाचन! वासरांना चारा घाल म्हणून सांगितलं मात्र, उठली, माळ्यावर जाऊन हें पुस्तक घेऊन आली. दिवसभर त्यांत डोकं खुपसून बसली आहे. फादर हार्ट! आम्हांला पडतं तसं काम पडूं द्या तिला, म्हणजे अखंड रडून कानठळ्या बसवील. पहाटे उठायचं, नंतर शिवण, मग स्वयंपाक! किंवा तुमच्यासारखं ऐन वादळांत रात्रीं घोड्यावर बसून बायबल घेऊन जायची वेळ येऊं द्या, नको जीव करील!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शॉन—फार रागावतेस तूं !

ब्रिजेट—तुम्ही नवरा बायको एक होणारच !

मार्टिन—माझ्या बायकोशीं ती कधी कधी भांडते, हें खरंच; तसंच आताहि उगीचच पुस्तक उघडून बसली आहे. पण तिला तितकासा दोष देणं बरं नाही. वैवाहिक सुखाच्या चंद्रालाहि कळा असतात, तो उगवतो, मावळतो, पुन्हा उगवतो, हें एकदा तिचं तिलाच कळलं, म्हणजे बदलेल ती ! धीर-गंभीर होईल अगदी !

फादर हार्ट—मूल होईपर्यंत त्यांचीं हृदयं भेदरकारच असतात. लहरी, स्वच्छंदी म्हणा, वाटल्यास ! बंधनं नको त्यांना ! पक्ष्यांची अवस्था अगदी !

ब्रिजेट—कधी भांडीं विसळायचीं नाहीत; गाईचं दूध काढील म्हटलं, तर तेंहि नाही; साधं जेवणाचं टेबल मांडीत नाही; मग इतर काय करणार ? कपाळ !

फादर हार्ट—हिला वाचनाची आवड आहे, हें मला आजच कळलं. आजपर्यंत तिच्या हातांत कधी पुस्तक दिसलं नाही. वाचते तरी काय आहे एवढं ?

मार्टिन—काय आहे त्या पुस्तकांत कुणास ठाऊक ! गेलीं पन्नास वर्षे माळ्यावर पडून होतें. माझ्या आजानें तें लिहिलं—माझा बाप म्हणायचं हें ! एक लाल रंगाचं कोवळं वासरूं मारून त्याच्या कातड्यानें आजानेच बांधलं तें पुस्तक ! राहूं द्या तें पण !—खुर्ची घ्या ना इकडे ! टेबल मांडून झालं !—चांगलंच फायद्यांत पडलं माझ्या आज्याला लेखन ! घरांत भसाड्या आवाजाचे शाहीर व कवि सदा जमायचे, श्रोत्यांनांहि कधीच वाण नसायची ! दिवसभर गोंधळ चालू ! सामान, अन्न, कपडे, सगळ्यांची व्यवस्थित नासधूस !—ही इथे आहे दारू ! आणि, ती पलीकडे ब्रेड, फादर हार्ट !—मेरी ! जेवण थंड होतं आहे ! हें कसलं वाचन ! मी किंवा माझा बाप अशीं पुस्तकं उघडून बसलों असतों, तर भिकेशीच मैत्री झाली असती आमची ! मग पायमोज्यांत चांदी सोन्याचीं नाणीं भरायचं कामहि पडलं नसतं, म्हणा, आम्हांला ! आता मी मेल्यावर हा सारा पैसा शॉनचा व तुझाच ! आणि, हा पैसा नसता म्हणजे !

फादर हार्ट—मेरी ! कांही तरी काल्पनिक वाचूं नये कधी ! काय आहे त्या पुस्तकांत !

मेरी—आयर्लंडच्या राजाची एक एडेनी नांवांची कन्या होती ! आजच्या सारख्याच मे महिन्यांतल्या एका पहिल्या संध्याकाळीं तिला कुणाचं तरी छान गाणं खिडकीबाहेर ऐकूं आलं ! अर्धवट झोपेंत असल्यासारखीच ती उठली व राजवाड्याबाहेर येऊन त्या आवाजाच्या मागोमाग जायला लागली ! जातां जातां पऱ्यांच्या राज्यांत गेली ती ! तिथं कुणी म्हातारं व्हायचंच नाही, कुणी गंभीर नसायचं आणि कुणी हें चांगलं, तें वाईट, अशी बडबडहि करायचं नाही ! हा शहाणा, तो वेडा हेंहि नव्हतं तिथं ! आणि मुख्य म्हणजे प्रत्येकजण इतका आनंदी की, दुसऱ्याचं उणं काढायला वेळच नाही कुणाला ! अजून पऱ्यांच्या राज्यांतच आहे ती राजकन्या ! नाचते आहे ! दाट जंगलांतल्या गर्द सावलींत दंव पडलेल्या मऊमऊ हिरवळीवर मनमुराद नाचणं चाललं आहे तिचं ! नाचण्याशिवाय दुसरं कांही नकोच तिला ! चांदण्या पर्वताच्या शिखरावर पाय ठेवायला लागतात, तरी हिचं नाचणं आपलं चालूंच आहे !

मार्टिन—फादर हार्ट ! तिला उपदेश करा तुम्ही ! असलीं पुस्तकं वाचणं वेडेपणा आहे, हें पटूं द्या तिला ! माझा आजा असलंच कांही तरी निरर्थ बडबडत असायचा दिवसभर ! व्यवहारज्ञानाच्या नांवानं मात्र पूज्य ! कुठलंहि कुलंगडं

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याला शिकारी कुत्रा वाटायचा ! बिचाऱ्याला गाढव व घोडा ह्यांतला तरी फरक कळत होता की नाही, देव जाणे ! कुठलंहि आळशी कारटंदेखील चार मुद्याच्या गोष्टी ऐकवायचं त्याला ! सांगा हें तिला सारं !

फादर हार्ट—मेरी ! ठेव तें पुस्तक दूर ! फेकून दे ! मेरी ! गरूड पंख पसरतो ना, तसा देव आपल्यावर आकाश पसरतो. मग येतो दिवस, मग रात्र ! किती तरी दिवस-रात्री येतात, जातात ! आपण जगत असतों. सत्कार्य करीत जगायचं असतं आपल्याला ! पण तें सोपं जात नाही ! देवाच्या पंखामागून, आकाशाच्या पलीकडून, शापित देवदूत हळूच येतात, आणि प्रत्येकाच्या वाटेवर मोहाचीं जाळीं लावून ठेवतात. किती तरी सापळे असतात आपल्यापुढे ! पावलापावलावर धोका ! आशेचा मोहक पडदा प्रत्येक फासावर टाकून ठेवतात ते देवदूत ! जादूचा पडदा असतो तो ! अगदी झिरझिरीत असला, तरी त्यांतून आतला सापळा दिसायच्या ऐवजीं रम्य, फिक्कट, निळसर प्रकाशांत सुखपूर्ण भविष्यकालाचा लटका देखावा मात्र दिसतो ! मोह पडतो त्या देखाव्याचा ! खोटा आत्मविश्वास वाटायला लागतो ! किंचित् दबकत आणि आनंदांत आपण उचललेलें पाऊल टाकतों आणि--आणि मग सत्यनाश ! मग अहर्निश हृदयांत अस्वस्थतेचें साम्राज्य ! मेरी ! त्या गोष्टींतल्या एडेनीची हीच गत झाली. कुठल्या तरी शापित देवदूताच्या गोड गोड शब्दांना भाळून विचारी जाळ्यांत सांपडली. अस्वस्थ, अशांत हृदयाच्या किती तरी तरुण मुली मला माहित आहेत. सदा असहाय्य बावरलेल्या असायच्या ! पण लौकरच त्यांची चूक त्यांनाच कळली व बदलल्या त्या ! शेजारच्या इतर बायकांसारख्या झाल्या ! मुलांचं संगोपन, दूधदुभतं, इतरांचीं लग्नं ठरवणं ह्यांत त्यांनाहि आनंद वाटूं लागला. जीवन हें असंच आहे ! सर्वांच्याच जीवनाचं असचं ! आरंभीं आरंभीं गुलाबी उजेडांत प्रगट होणारीं भविष्यकालासंबंधींची मोहक स्वप्नं प्रत्येकालाच भुरळ पाडतात. पण हळूहळू तो गुलाबी उजेड नाहीसा व्हायला लागतो, आणि, त्याची जागा तूं, मी पाहतों हा खराखुरा प्रकाश घेतो. ह्या प्रकाशांत साऱ्या वस्तु यथातथ्य दिसतात. आणि,मग मनुष्यहि बदलतो. म्हातारपणापर्यंत चालतं हें.मग पुन्हा तो गुलाबी उजेड व तींच गुलाबी स्वप्नं !

शॉन—फादर हार्ट ! तुम्हांला वाटतं इतकी ती दोषी नाही ! मी शेतावर गेलों की, ती एकटी घरीं कंटाळते. मग बसते कांही तरी करीत ! त्यांतलंच तिचं हें वाचन ! माझ्या आईच्या जिभेचा पट्टा ठाऊकच आहे तुम्हाला ! सारखी रागावत असते ! मेरी अशी आपल्याच तंद्रीत असली, म्हणजे आईचं बोलणंहि तिच्या हृदयाला लागत नाही तितकसं ! फादर हार्ट ! त्यांतून आज मे महिन्यांतील पहिली संध्याकाळ ! आज किती तरी उपकारी 'व्यक्ति' पृथ्वीवर हिंडत असतात. मेरी ! दारापुढे गुलाबाचीं फुलं पसरलीस का ! त्या फुलांवरून त्या व्यक्ति आपल्याला शुभाशीर्वाद देण्याकरिता येतील ! मेरी ! आणि त्या व्यक्ति नूतन विवाहित तरूणींना पळवतात, हेंहि लक्ष्यांत ठेव, हं !

[मेरी खिडकींतील पुष्पपात्रांमधली वरीचशीं फुलं ओंजळींत घेऊन दारा- जवळ जाते व तीं दाराबाहेर उधळते]

फादर हार्ट—छान ! छान ! मुली ! देव त्या व्यक्तींना आज आजच्या पुरतेंच विलक्षण सामर्थ्य देतो. आज मे मधली पहिली संध्याकाळ !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मार्टिन—त्या व्यक्तींच्या इच्छेप्रमाणं आज सारं घडायचं ! त्यांच्या इच्छेने त्या गुलाबांच्या फुलांचं सोनं होईल ! आणि, जर का त्या व्यक्तींशी कुणी गैरवर्तन केलं, तर मेरी ! त्या फुलांचेच जळजळीत निखारे व्हायलाहि वेळ लागायचा नाही !

मेरी—मी गुलाबाचीं फुलं दारांतून बाहेर फेकलीं मात्र, तोंच वारा कण्हत कण्हत कुठूनसा आला व त्याने सारीं फुलं उचलून नेलीं.

ब्रिजेट—हें काय अशुभ घडलं ! देवा ! दया कर आमच्यावर !

मेरी—आज त्या उपकारी व्यक्ती आपल्या घराच्या बाबतींत अपकारी ठरणार ! नक्कीच ! पण मी त्यांच्या मार्गावर गुलाबाचीं फुलं उधळलीं, हें चांगलंच केलं ! कारण त्या व्यक्ति झाल्या, तरी देवाचींच लेकरें ना ?

फादर हार्ट—मेरी ! देवाचीं लेकरं अशीं नसतात. तीं सैतानाचीं लेकरं ! काळाचा अगदी शेवटचा क्षण जन्म घेईपर्यंत त्या व्यक्तींचा प्रभाव अनुभवास येणारच ! काळाच्या मृत्यूनंतर मात्र देव त्या व्यक्तींशी लढाई करील आणि त्यांचे तुकडे तुकडे करील !

मेरी—छे ! देव दयाळु आहे ना ? तो स्वर्गाचा दरवाजा हसत हसत उघडून त्यांना आंत घेईल !

फादर हार्ट—हंऽऽ ! सैतानाच्या असल्या दुष्ट लेकरांना तो दरवाजा पाहूं दे मात्र, स्वर्गातल्या सौख्यपूर्ण शांतीच्या केवळ ओझरत्या दर्शनानेच तीं लेकरं पटापट मरून पडतील ! ती दैवी शांतीच वध करील त्यांचा. आणि, असल्या व्यक्ति हीं असलीं रूपं जेव्हा आपणा मानवांचा दरवाजा ठोठावतात आणि जेव्हा आपण त्यांच्या मागून जातों, तेव्हा आपलीहि तीच गत व्हायला विलंब लागत नाही.

[कुणी तरी दरवाजा ठोठावते. मेरी पुन्हा दार उघडते. नंतर कपाटाजवळ जाऊन एक भांडें दुधाने भरून आणते व दरवाजाबाहेर उभ्या असलेल्या कुणाला तरी तें देते ! रिकामें भांडें परत घेऊन ती पुन्हा दार घट्ट लावून घेते. हें दार अर्थात् घराबाहेर पडण्याचें.]

मेरी—एक विलक्षण चेहऱ्याची ठेंगणी, म्हातारी आली होती. हिरवा वेष होता तिचा ! भांडंभरं दूध मागायला आली होती !

ब्रिजेट—हं ! त्या उपकारी व्यक्ती आजच्या दिवशीं अशाच दूध आणखी विस्तव मागत दारोदार हिंडतात. ज्या घरांतून ह्या वस्तू मिळतील, त्यांचं रक्षण परमेश्वर करो ! कारण मग वर्षभर त्या घरावर त्या व्यक्तींची सत्ता चालते. मेरी ! मला माहितच होतं की, तूं आमच्या ह्या घराचा सत्यनाश करशील !

मार्टिन—कोण होती ती ?

मेरी—चेहरा अगदी अनोळखी होता तिचा ! आवाजहि अगदी अपरिचित !

मार्टिन—गेल्या आठवड्यांत 'क्लोव्हर हिल्'च्या तिकडे कांही पाहुणे उतरले आहेत, त्यांपैकी असेल कुणी !

ब्रिजेट—का कुणास ठाऊक, पण पटत नाही हें ! भीति वाटते मला !

मार्टिन—फादर हार्ट धर्मोपदेशक आहेत ! त्यांचं सान्निध्य अशुभ गोष्टी दूर ठेवायला पुरेसं आहे.

फादर हार्ट—तो क्रूस आहे ना तिथे भिंतीला टांगलेला ! ज्या घरांत हा क्रूस आहे, त्या घराच्या भाग्याबद्दल संशय कशाला !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मार्टिन—मेरी ! इकडे ये, बस इथे माझ्याजवळ ! तुझी ही स्वप्नाळु वृत्ति तुला आता टाकायला हवी ! मेरी ! तूं नेहमी उगाचच असंतुष्ट असतेस, म्हणून तुला स्वप्नांत, कल्पनासाम्राज्यांत रमून जायला आवडतं ! माझ्या म्हातारपणीं माझ्या भोंवतालचा अंधार उजळायला, मेरी, तुला माझा प्रकाश व्हायला हवं ! अंधाऱ्या रात्रीं पाईन झाडाच्या फांदीची दिवटी हातांत घेऊन त्या उजेडांत नाही का आपण घरीं परत जात ? तसं ! मी तसाच मृत्युकडे जाईन ! आणि, मेरी, माझ्या मरणा-नंतर देखील तुला कसलीच ददात पडणार नाही. एक मोठा पायमोजा चांदी-सोन्याने भरलेला मी लपवून ठेवलेला आहे ! तुलाच मिळायचा तो ! तुझ्याइतकी संपन्न स्त्री मग तूंच आपल्या गांवांत !

ब्रिजेट—वा, मी इकडे काटकसर करीत जगायचं, कारण काय, तर माझ्या सुनेला नटतां यावं ! ठीक !

मार्टिन— रागावूं नकोस ! मेरी तशी चांगली मुलगी आहे. फादर हार्ट लोणी घ्या ना तें ! तें पलीकडे आहे. मेरी ! दैव, आमचं वाढतं वय आणि भोवता-लची बदलती परिस्थिती ह्यांनी आमचा किती फायदा केला आहे, बघ ! शंभर एकर जमीन आमच्या स्वत:च्या मालकीची आज आहे. शेगडीशीं मी व ब्रिजेट असं जवळ जवळ बसतों, उजव्या हाताला हे सन्मान्य धर्मोपदेशक; डाव्या हाताला आमचा मुलगा आणि सून ! असं शेगडीशी बसून उत्तम जातीची दारू पीत सुखाच्या गोष्टी बोलायच्या ! शेगडींत जळणाऱ्या गवताचा धूर सापासारखा आढ्याकडे जायला लागला की, त्याच्याकडे थोडावेळ पहायचं व आपण किती सुखी आहों हें पुनः पुन्हा मनांत आणायचं ! मेरी ! हेंच खरं जीवन ! हेंच समाधान, हेंच खरं सुख ! जेव्हा आपण तारुण्यांत असतों, तेव्हा रुळलेल्या मार्गानें जाणं आपल्याला आवडत नाही. आपली वाट निराळीच असावी, असं आपल्याला वाटतं. पण—पण, अखेर, चार लोकांचाच मार्ग आपण स्वीकारतों. प्रेमाचा अनुभव येतो, मग लग्न, मुलंबाळें, झाली संसाराला सुरवात ! आपोआपच संसारांत गोडी लागते ! त्यांतलीं साधींसुधीं सुखं स्वर्गसुखं वाटूं लागतात. मग हलकेच वार्धक्य ! आणि, अखेर तो शेवटचा क्षण ! —दैव, आयुष्य, परिस्थिती ह्यांना अखेरचा प्रणाम केला की, जगांतून कूच ! संपलं पृथ्वीवरलं आयुष्य !

पुन्हा कुणी तरी दार ठोठावतें. मेरी दरवाजा उघडून शेगडीकडे येते आणि चिमट्याने एक धुमसणारं ढेकूळ उचलून दरवाज्याबाहेर उभ्या असलेल्या कुणाला तरी तें देते व पुन्हा दार बंद करून तिथेंच उभी राहते.)

मेरी—एक विलक्षण चेहऱ्याचा ठेंगणा म्हातारा आला होता. हिरवा कोट घातला होता त्याने ! ' पाईप ' पेटविण्याकरिता विस्तव हवा होता त्याला !

ब्रिजेट—मघाशी दूध, आता विस्तव ! निकाल लागला ! मुद्दाम या घराचं अकल्याण करायचंच ठरविलं आहेस तूं ! लग्नापूर्वी तूं सुस्वरूप आणि आळशी होतीस. डोक्याला रंगीबेरंगी फिती बांधून हिंडायचीस. आता लग्नानंतर दुप्पट आळशी झाली आहेस ! आतां तर केवळ आमच्या श्रमांवर जगते आहेस ! काय पण बायको !

शॉन—आई ! एक शब्द बोलूं नकोस आता !

मार्टिन—फार रागीट स्वभाव आहे तुझा !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मेरी—ह्या घरांत आल्यापासून माझ्या निदेशिवाय कांही ऐकूंच येत नाही मला ! ह्या घराचं वाटोळं झालं, तर त्याची पर्वा मला का असावी ? ' पऱ्यांनी, ह्या घराचं संपूर्ण अकल्याण केलं, तरी मला वाईट वाटायचं कांहीच कारण नाही !

ब्रिजेट—मेरी ! त्या व्यक्तींना ह्या नांवाने संबोधायचं नाही, हें माहीत आहे तुला ! त्यांचा तसा उल्लेख केला, किंवा त्यांच्याविषयीं फार बोललं की, रसातळाला जातं घर !

मेरी—मी त्या व्यक्तींना ' पऱ्याच ' म्हणणार ! होईल तें होवो ! पऱ्यांनो ! या, या, ह्या घरांतून घेऊन जा मला ! मला सोडवा ! माझं गमावलेलं स्वातंत्र्य, पऱ्यांनो, मला परत द्या ! माझी लहर लागेल, तेव्हा मी काम करीन; मनास येईल, तेव्हा स्वस्थ बसेन ! पऱ्यांनो ! ह्या यांत्रिक आयुष्यांतून मला मुक्त करा ! मला तुमच्या बरोबर वाऱ्यावर तरंगायचं आहे, समुद्राच्या भरतीच्या लाटांवर धावायचं आहे. आणि, एखादी ज्वाला जशी नाचते, तशी, पर्वताच्या शिखरावर मीहि नृत्य करीन ! पऱ्यांनो ! या !

फादर हार्ट—मेरी ! वेड का लागलं आहे तुला ? काय बडबडते आहेस हें ? अर्थ तरी कळतो का तुला त्याचा ?

मेरी—फादर हार्ट ! चार प्रकारच्या जिभांचा वीट आला आहे आता मला ! फार शहाणपणा शिकविणारी ढोंगी जीभ, उगाचच फार गंभीर बोलणारी जीभ, भरतीच्या लाटेपेक्षाहि अधिक कल्लोळ-निंदेचा कल्लोळ--करणारी जीभ आणि प्रेमाच्या भाषेत केवळ कामुकता लपवून ठेवणारी जीभ ! प्रेम म्हणजे पारतंत्र्य हें पटवायचा प्रयत्न करणारी जीभ ! फादर हार्ट ! माझ्या पारतंत्र्याला कंटाळलें आहे मी ! शीण आला आहे मला !

[शॉन मेरीजवळ येतो व तिला कोचाकडे घेऊन जातो.]

शॉन—मेरी मला दोष देऊं नकोस ! तुझ्या दुःखांचा विचार करीत रात्र रात्र तळमळत असतों मी ! तुझ्यासारख्या भावनाप्रधान व्यक्तींचीं दुःखं मला समजतात; तुझें हें सुरेख मस्तक दुःखांच्या भाराने किती थकून गेलें आहे, हें मला ठाऊक आहे ! मेरी किती विशाल आहे तुझं कपाळ ! तुझ्या असामान्य बुद्धिमत्तेची पताका आहे ती ! आणि, ह्या अद्वितीय भुवया ! आणि काळ्याकुट्ट वादळी ढगा-सारखे हे केस ! मेरी ! माझ्याजवळ इथे ह्या कोचावर बस ! हा कोचसुद्धां बघ किती म्हातारा झाला आहे ! एकेकाळीं आपण तरूण होतों ह्याचा विसर पडला आहे बिचाऱ्याला !

मेरी— तूं ह्या घराचा भक्कम विजय-स्तंभ आणि त्याच्या आधारावर त्यालाच गुरफटून टाकणारी तांबड्या फुलांची वेल मी !

[मेरी शॉनचा हात हातांत घेते, परंतु फादर हार्टकडे पाहून लाजून पुन्हा हात सोडते]

फादर हार्ट—वेडी कुठली ! शॉनचा हात का सोडलास ? कुठलंहि प्रेम देवाला आवडतं ! प्रेमाच्या तंतूनीच देव आपणा मानवांना संसाराशीं व स्वतःशी बांधतो ! हें प्रेमच मानासिक अस्वस्थता नाहींशी करून दैवी शांतीचं दर्शन घडवतं ! मेरी ! भलत्या मार्गाकडे नेणारं स्वातंत्र्य आणि आंधळं करणारा प्रकाश-ह्या दोहोंपासून हें प्रेमच आपलं संरक्षण करतं !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शॉन— मेरी ! असं वाटतं की, हें सारं जग माझ्या मालकीचं हवं होतं ! सारीं शांत घरें, ओसाड माळ, रानटी झाडांचा आणि भरतीच्या लाटांचा स्वच्छंदीपणा व टेकड्यांच्या मागचा मोहक संधिप्रकाश हीं सारीं मी तुला देऊन टाकलीं असतीं !

मेरी—असं जग तूं मला दिलं असतंस, तर मी काय केलं असतं, सांगू ?–असं हातांत घेऊन त्याचा चूर चूर केला असता ! तूं जवळ हंसत उभा आणि मी जगाचा चुराडा करण्यांत गर्क !

शॉन—मग त्या मातींतून मी पुन्हा नवं जग घडवलं असतं ! तेज आणि दंव ह्यांचं जग ! त्या जगांत कुणी कडू बोलणारं नाही, कुणी गंभीर नाही, कुणी वाजवीपेक्षा जास्त शहाणं नाही आणि तुला दुःख व्हायला कुणी म्हातारं वा मत्सरी नाही. मेरी ! आणि, त्या जगांत मृत्यु असणार नाही ! आकाशांत असंख्य तारका चमचम करीत असतांना तुझ्या शवाभोंवतीं मेणबत्त्या लावणारं कुणी नको त्या जगांत !

मेरी—माझ्या मेणबत्त्या म्हणजे तुझे हे डोळे ! त्यांच्याकडे बघतांना मला अस्तित्वच उरत नाही !

शॉन—मेरी ! एक काळ असा होता की, एखादा पतंग सूर्याच्या कोंवळ्या उन्हांत उडतांना तुला दिसला, किंवा दिशा फाकल्यावर रंगित पूर्वेकडून गार वाऱ्याची झुळूक आली की, तूं आपल्या स्वप्नांत रंगून जायचीस ! तुझीं तीं स्वप्नं, त्यांचा अर्थ, कुणालाच कधीं कळला नाही ! त्यावेळीं तुझ्या हृदयांत स्वाभिमान व जगाविषयीं पूर्ण बेफिकिरी ह्यांशिवाय दुसरं कांहीं नव्हतं ! पण आता तूं बदलली आहेस ! अधिक अंतर्मुख झाली आहेस ! तुझ्या त्या हृदयांत आता मी व माझ्या प्रेमाची ऊब ह्यांचा प्रवेश झालेला आहे ! मेरी ! हा सूर्य आणि चंद्र केव्हा ना केव्हा निस्तेज होतील आणि मखमलीचा मोठा गालिचा गुंडाळावा तसें हें आकाशहि गुंडाळलं जाईल, पण आपले पवित्र आत्मे सदोदित एकरूपच राहतील ! मेरी ! स्वर्ग, मृत्यु, पाताळ—ह्यापैकीं एकालाहि दोन हृदयं एक करणारं आपलं प्रेमबंधन तोडतां यायचं नाही !

[लांबून गाण्याचे स्वर ऐकूं येतात.]

मेरी—कुणी हाक मारते आहे का ?–माझं संरक्षण कर, कारण आज मी बोलूं नये तें बोललें !

[दरवाज्याबाहेरून गाणें ऐकूं येतें]

पूर्वदिशेंतुन आला वारा
उघडा हृदयें आला वारा !
कुणि एकाकी निघे जावया
अम्हांसवें ये, निराश हृदया !
आम्हां पऱ्यांचें निराळेंच जग
आम्हांसवें ये आनंदें जग !
दुधासारखे शुभ्र, चिमुकले
पाय आमुचे नर्तनिं रमले
हात चिमुकले वाऱ्यावरती
फेर धरोनी पऱ्या नाचती
करीत कुजबुज हसतो वारा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करीत नर्तन गातो वारा
त्या जगताचें गातो गाणें
जिथें भाषणें नसति दूषणें
जिथें सूज्ञही नसती गंभिर
जिथें वृद्धही सारे सुंदर!
परी एकदा चंद्रप्रकाशीं
घेउनि लतिका मज करपाशीं
वदली कानीं, "अफाट जगतीं
एकाकी जे जीवन जगती
नाश तयांचा निश्चित, निश्चित
जधीं वायुची कुजबुज थांबत!"

मार्टिन—खूप सुखांत आहे मी! आणि प्रत्येकजण सुखी असावं, असं वाटतं आहे मला! कुणा तरी लहान मुलीचा आवाज आहे हा! किती थंडी आहे बाहेर! मी त्या बिचारीला आंत आणतों!

(मार्टिन दरवाजा उघडतो. बाहेर एक लहान मुलगी उभी असते. तिच्या अंगांत एक हिरवेंगार जाकिट असून तिने एक उभट तांबडी टोपी घातलेली आहे. ही 'परी' आहे. मार्टिनबरोबर ती मुलगी आंत येते.)

मुलगी—वारा, पाणी आणि अंधुक उजेड ह्यांचा कंटाळा आला आहे मला!

मार्टिन—आम्ही स्वागत करतों तुझं! फार थंडी आहे बाहेर! असल्या थंडींत आजच्या दिवशीं बाहेर रहाणं कुणाला आवडेल?

मुलगी—मला ह्या उबदार लहानशा घराचा कंटाळा आला की, मी जाईन! मोठमोठे वृक्ष, फेसाळणारे घबधबे आणि आकाशांतल्या चांदण्या ज्या ठिकाणीं उत्सवांत दंग आहेत, तिथे मी जाईन! पण एकटी नाही जाणार मी! इथल्या एका व्यक्तीला घेऊन जाईन!

मार्टिन—ऐका हिचीं हीं स्वप्नं व त्यांतलं हें बरळणं! मुली! इकडे ह्या शेगडीशी ये!

मुलगी—तुमच्या मांडीवर बसतें मी! जिथून वारा येतो, तिथून आलें मी! माझे पाय थकून गेले आहेत अगदी! त्यांना विश्रांति हवी आहे!

[मुलगी मार्टिनच्या मांडीवर बसते.]

ब्रिजेट—किती सुरेख आहेस तूं!

मार्टिन—तुझे केस दवाने भिजले आहेत.

ब्रिजेट—किती गार पडले आहेत तुझे पाय! थांब, मी चोळतें, म्हणजे ऊब येईल त्यांना!

मार्टिन—पुष्कळच लांबून आलेली दिसतेस तूं! कारण तुझा हा मोहक चेहरा पूर्वी कधी पाहिल्याचं आठवत नाही. खूप थकली असशील तूं! भूकहि लागली असेलच! ही घे 'ब्रेड' आणि ही थोडी दारू.

मुलगी—शी: ! दोन्हीहि आवडत नाहीत मला! आजी! कांही तरी चांगलं खायला दे मला!

ब्रिजेट—मध आहे घरांत!

[ब्रिजेट दुसऱ्या दारांतून आतल्या खोलींत जाते.]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मार्टिन—फार आवडतेस मला तूं ! आजी खूप रागांत होती तूं आलीस तेव्हा !

[ब्रिजेट मद्य घेऊन येते आणि कपाट उघडून त्यांतून एक भांडें दुधाने भरून आणते.]

ब्रिजेट—चांगल्या सुखवस्तु घरांतली मुलगी दिसते ही ! हिचे हे गोरे नाजूक हात पहा ! कपडे सुद्धा किती सुरेख आहेत ! हें बघ, ताजं दूध आणलं आहे तुझ्यासाठी ! पण थोडी थांब ! विस्तवावर दूध थोडं गरम करून देतें ! आम्हा गरिबांना गार दूध चालतं, पण तुला नाही आवडायचं तसं !

मुलगी—आजी ! उजाडतांना आकाश सोनेरी होतं, तेव्हा तूं शेगडी फुंकीत बसतेस व संध्याकाळीं आकाशांत सोन्याचे कण साचायला लागले की, तूं टेबलावर पांढरी चादर आंथरीत असतेस ! जे तरुण आहेत ते अशावेळीं आशेशी गुजगोष्टी करतात आणि स्वप्न बघतात ! तूं काम करतेस, कारण तुझं हृदय म्हातारं झालं आहे !

ब्रिजेट—आळशी असतात तरुण व्यक्ति !

मुलगी—आजोबा ! तुम्ही शहाणे आहांत ! तुमच्या हृदयांत किती तरी वर्षांचा अनुभव आहे. गतकालांतील सुखांच्या क्षणांबद्दल तुम्ही बोलूं शकता ! तरुण व्यक्तींचं तसं नाही. स्वप्नभंग झाला की, बिचाऱ्या केविलवाण्या होऊन सुस्कारे टाकतात आणि पुन्हा आशेवर जगायला लागतात, पण आजोबा ! तुम्ही शहाणे आहां, कारण तुमचं हृदय म्हातारं आहे !

[ब्रिजेट मुलीला आणखी ब्रेड व मद्य देते.]

मुलगी—पुष्कळ झालं, आजी ! पुरे !

मार्टिन—किती थोडी ब्रेड खाल्लीस ! हें घे दूध ! पोट भरलं एका घोटानं हिचं !

मुलगी—आजी ! झालं माझं जेवण ! माझ्या पायांत बूट घाल ! मला नाचायचं आहे ! सगळ्या सरोवरांच्या काठावरच्या वेली आता नाचताहेत. त्या सगळ्या वेली, हा वारा, किनाऱ्यावरच्या समुद्राच्या लाटा आणि सर्व चांदण्या नाचतां नाचतां थकून झोपी जाईपर्यंत मला नाचायचं आहे !

[ब्रिजेटने मुलीच्या पायांत बूट घातल्यावर ती मार्टिनच्या मांडीवरून खालीं उतरते ! ती नृत्याला प्रारंभ करणार, इतक्यांत तिचें लक्ष्य भिंतीवर टांगलेल्या 'क्रूस' कडे जाते व ती किंचाळून डोळे हातांनी झाकून घेते.]

मुलगी— भिंतीवर तें अशुभ काय आहे ?

फादर हार्ट— किती चमत्कारिक बोललीस तूं, हें तुला कळायचं नाही ! तो पवित्र क्रूस आहे !

मुलगी—लपवून ठेवा तो !

ब्रिजेट—पुन्हा भीति वाटायला लागली मला !

मुलगी—लपवा तो !

मार्टिन—प्रभूचा अपमान होईल !

ब्रिजेट—अधर्म होईल तो !

मुलगी—लपवा तो ! त्याच्यावर रक्त सांडलं होतं; अशुभ आहे तो ! माझ्या दृष्टीसमोर नको !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मार्टिन—हा सारा आईबापांनी दिलेल्या शिक्षणाचा परिणाम !

फादर हार्ट—देवाच्या पुत्राची प्रतिमा आहे ती !

[मुलगी फादर हार्टच्या मानेभोवती आपल्या हातांचा विळखा घालून त्यांचें चुंबन घेते.]

मुलगी—लपवा तो, अगोदर लपवा !

मार्टिन—छे, छे !

फादर हार्ट—तूं इतकी लहान आणि अजाण आहेस की, केवळ तुला नको म्हणूनच मी तो क्रूस लपवून ठेवतों !

मुलगी—लपवून ठेवा तो ! दिसायला नको पुन्हा ! आठवणसुद्धा नको त्याची !

[फादर हार्ट भिंतीवरील क्रूस काढून घेऊन आतल्या खोलींत जायला निघतो.]

फादर हार्ट—मुली ! सुदैवानें आज तूं आमच्याकडे आली आहेस, तेव्हां तुला आज धर्मदीक्षा द्यायला हरकत नाहीं ! हुशार आहेस तूं ! सगळं समजेल तुला ! मार्टिन ! ह्या असल्या उमलत्या कळ्यांची जोपासना काळजीपूर्वक करायला हवी. तिला क्रूस आवडत नाहीं तर ठेवूं उचलून ! प्रभूलासुद्धा आवडेल आपलं वर्तन ! चिमुकल्या तारकांच्या गाण्यांत क्रुसाचा उल्लेख कशाला ? (क्रूस आंतल्या खोलींत नेऊन ठेवतो.)

मुलगी—किती छान जमीन आहे ही नाचायला ! किती गुळगुळीत आहे !

[नाचत गाणें म्हणते]

तरूलतांना डुलवी वारा
उघडा हृदयें आला वारा !

[नाचतांना ती डुलणाऱ्या लतिकांसारखी डुलते.]

मेरी (शॉनला)—आता ती नाचत जवळ आली ना, तेव्हां मला इतर चिमुकल्या पावलांचाहि आवाज ऐकूं आला ! आणि, दुरून अस्पष्ट अशी वाद्यांची साथहि ऐकूं आली !

शॉन—छे ! मला तर फक्त तिच्याच पावलांचा आवाज ऐकूं आला !

मेरी—कडी लाव दरवाजाला ! आज सगळ्या अशुभ शक्ति स्वैर फिरताहेत

मार्टिन (मुलीला)—इकडे ये ! कांहीं अशुभ बोलणार नाहीं, असं कबूल करशील, तर एक गंमत देईन मी तुला !

मुलगी—आजोबा ! अगोदर ती गंमत दाखवा मला !

[मार्टिन आतल्या खोलींत जातो]

फादर हार्ट—माझ्याकडे आलीस, तर मी तुला एक खूप मोठी गोड 'केक' देईन !

[मार्टिन परत येऊन टेबलावर एक नाणें ठेवतो. मुलगी तें घृणेनें नाकारते]

मार्टिन—बघ, कसं चकाकतं आहे ! किती तरी खेळणीं घेतां येतील तुला !

मुलगी—खरं सांगा ! तुम्हांला आवडते मी ?

मार्टिन—खूपच आवडतेस !

मुलगी—पण माझ्यापेक्षा तुम्हांला हें घर आणि ही शेगडीच जास्त आवडतें !

 फादर हार्ट—मलाहि फार आवडतेस तूं !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुलगी—पण आकाशांतल्या देवावर तुमचं जास्त प्रेम आहे !

ब्रिजेट—ही तर आता देवाबद्दल उद्गार काढायला लागली.

मुलगी—[मेरीला] आणि, तुझं आहे प्रेम माझ्यावर ? आवडते मी तुला ?

मेरी—कुणास ठाऊक !

मुलगी—तुझं प्रेम त्या उंच, सशक्त तरुणावर आहे ! तरी पण मला तुला वाऱ्यावर तरंगवतां येईल, अस्ताव्यस्त पसरणाऱ्या लाटांवर तुला धावतां येईल, एखादी ज्वाला जशी नाचते तशी पर्वताच्या शिखरावर तूं नाचशील !

मेरी—देव आणि सारे सत्पुरुष आमचं रक्षण करोत ! कांही तरी अभद्र घडतं आहे. ही येण्यापूर्वी मीं टाकलेलीं गुलाबाचीं फुलं वाऱ्याने कण्हत कण्हत उचलून नेलीं ! मी दूध आणि विस्तव दाराबाहेर दिला ! ही आली, तर हिने पहिल्या प्रथम क्रूस लपवायला लावला ! हिचा वेषहि पहा ना ! हिरवं जाकिट आणि लाल टोपी अभद्र शक्ती असणाऱ्या स्वरूपांचा हा ठरलेलाच वेष आहे !

फादर हार्ट—ती कांही तरी बडबडते आहे, म्हणून तुला वाटतं असं ! तिला काय समजतं मेरी [मुलीकडे पाहून] मुली काय वय आहे तुझं ?

मुलगी—पुष्कळ वर्षे जगतों आम्ही ! आणि, त्या मानानें म्हणाल, तर अगदीं लहान आहे मी ! पण तुमच्या आयुष्याच्या मापानं पहाल, तर डोळ्यांची सतत उघडझाप करणाऱ्या तुमच्या गरूडकोंबड्या पेक्षाहि किती तरी म्हातारी आहे मी ! सर्वांपेक्षा अधिक आयुष्य असतं गरूडकोंबड्याला असं म्हणतां तुम्ही ! कित्येक वेळा नाचण्याशिवाय मला सुचतच नाही दुसरं कांही ! कधी कधी मात्र तुमच्या शहाण्या गरूडकोंबड्यापेक्षांहि अधिक शहाणपण आठवतं मला ! आणि, मग थोडा-वेळ स्वस्थ बसतें मी !

फादर हार्ट—आहेस तरी कोण तूं ?

मुलगी—मी ' परी ' आहे ! माझे दोन जासूद मी दूध व विस्तव आणण्या-करिता पाठविले. मग कुणीतरी मला हाक मारली आणि मी आलें !

[सर्वजण बावरून फादर हार्टभोवती गोळा होतात. मेरी मात्र भीतीने निष्प्राण झाल्यासारखी कोचावरच बसून राहते. मुलगी खिडकीतल्या भांड्यामधलीं उरलेलीं फुलें हातांत घेऊन तीं आपण व फादर हार्ट ह्यांच्या मधल्या जमीनीवर व मेरीभोवती विखरून टाकते ! पुढील संवाद चालू असतांना शॉन मधून मधून मेरीकडे जायचा प्रयत्न करतो, पण फुलांतील अद्भुत शक्तीमुळे ती ओलांडून त्याला पलीकडे जातां येत नाही. तो पुनः पुन्हा भिऊन मागें फिरतो.]

फादर हार्ट--ह्या दुष्ट शक्तींचा पराभव मी एकटा करतों !

[सर्वजण त्याला मागे ओढतात.]

मुलगी--[फुलें पसरीत असतांना म्हणते].

चंद्राच्या कोरी गुलाबी मोहक
रक्षण करणें मजला नाजुक
अश्रूंनी हृदयें ज्यांचीं भारावती
ओलांडाया चंद्र नसे तयां शक्ति.

फादर हार्ट--घाबरूं नका ! प्रभु आपला पाठिराखा आहे ! आणि सगळे देवदूत, सारे संत, आणि ज्याचें पुनरुत्थान झालें तो, आणि त्याची पवित्र माता ह्या सर्वांचा आपल्याला आधार आहे ! भिऊं नका !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

[फुलें उधळून झाल्यावर मुलगी मेरीसमोर गुडघे टेकून बसते व तिच्या मानेला हातांनी विळखा घालते.]

फादर हार्ट—मेरी ! प्रभूची करुणा भाक ! त्याची प्रार्थना कर !

मुलगी—चल, माझ्याबरोबर अथांग आनंदाच्या जगांत चल ! तिथे भावनांची उपासमार होत नाही, तिथे फसवी आशा नाही, तिथे नुसता खराखुरा आनंद आहे; आनंद ! अथांग आनंद ! ! चल, चल, माझ्याबरोबर ! तिथलं सौंदर्य शाश्वत आहे ! आनंदी वृत्ति हें ज्ञानाचं लक्षण आहे ! तिथं रात्रंदिवस मंजुळ गायन चाललेलं आहे ! चल !

फादर हार्ट—मेरी ! इकडे ये ! इकडे प्रेम आणि तुझं इतर सारं सारं कांही आहे !

मुलगी—चल, मी तुझं चुंबन घेतें, म्हणजे हें जग तुझ्या दृष्टीआड होईल ! कांहीं एक ऐकूं नकोस त्याचं ! त्याचं ऐकशील, तर इतरांसारखीच होशील ! पोरंबाळं, गुरंढोरं, दूधदुभतं, कोंबड्या आणि अंडीं ह्यांतच रमशील ! अखेर म्हातारपण, चिडखोर स्वभाव आणि जळून गेलेल्या आशेच्या राखेचा तोंडावर थर ! मग बसशील आकाशांतल्या तारका मोजीत !

फादर हार्ट—मेरी ! इकडे ये, मी तुला स्वर्गसौख्याचा मार्ग दाखवतों !

मुलगी—चल, अशा ठिकाणीं जाऊं की, जिथे चिरयौवन आहे ! जिथे कुणी गंभीर नाही, ढोंगी नाही ! जिथे निंदा करणाऱ्या जिभा नाहीत ! जिथे प्रेम म्हणजे ताबेदारी नाही ! चल, लांबून ताऱ्यांच्या पलीकडून गाण्याचे स्वर येतात; त्या स्वरांच्या अनुरोधाने हसत हसत, गात, गात दऱ्याखोरीं पायाखाली घालीत आपण जाऊं ! चल ! चल ! !

फादर हार्ट—मेरी ! लोकांच्या तारणासाठी क्रुसावर चढलेल्या येशूच्या पवित्र नांवाचा उच्चार करून मी तुला सांगतों की, इकडे ये ! इकडे ये ! !

मुलगी—तुला तुझ्या भावनांची, तुझ्याच हृदयाची शपथ आहे, माझ्याबरोबर आली नाहीस तर ! चल !

[मुलगी मेरीजवळून उठते व वाकून खाली पडलेलीं कांहीं फुलें घेऊन त्यांचें चुंबन घेते.]

मुलगी—फुलांनो ! प्रिय गुलाबी फुलांनो ! आजची रात्र आमची आहे ! आज आमच्यांत विलक्षण सामर्थ्य आहे ! त्याने क्रूस लपवून ठेवला आणि माझ्या सगळ्या चिमुकल्या अदृश्य बहिणी या घरांत शिरल्या ! त्यांच्या लहान लहान पावलांचे आवाज मला स्पष्ट ऐकूं येत आहेत ! प्रत्येक मानवी हृदयाचा ताबा आम्ही लवकरच घेऊं ! लवकरच सर्व पृथ्वीवर आम्ही राज्य करूं ! गेल्या रात्रीं घंटा असलेल्या चर्चच्या मिनाराभोवती आम्ही मजेनें नृत्य केलें ! [मेरीला] चल, माझ्या बहिणी मला हाका मारीत आहेत ! चल !

फादर हार्ट—मी क्रूस घेऊन येतों !

[सर्वजण भीतीने त्याला बिलगून खोलींतून बाहेर जाऊं देत नाहीत.]

ब्रिजेट—जाऊं नका ! हीं मारलेलीं फुलं आमचा जीव घेतील !

मार्टिन—ह्या फुलांचे निखारे व ज्वाला होतील !

शॉन—ते निखारे हृदय जाळतात.

मुलगी—चल, आपल्या दोघींना माझ्या बहिणी हाक मारीत आहेत, चल !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मेरी—चल ! येतें मी तुझ्याबरोबर !

फादर हार्ट—झालं ! संपलं ! सैतानाचा विजय झाला ! गरीब विचारी !

मुलगी—चल ! पण हें जड मातीचं शरीर घेऊन येतां यायचं नाही तुला ! आणि, बिलगणारी वेडी मानवी आशा सुद्धा तुला दूर ढकलावी लागेल ! तिचं ओझं नको बरोबर ! कारण, आम्ही उषेच्या निशाणावर पडणाऱ्या दवबिंदूपेक्षाहि हलक्या असतों; म्हणून तर आम्हांला वाऱ्यावर तरंगतां येतं, लाटांवर धावतां येतं आणि पर्वताच्या माथ्यावर मनसोक्त नाचतां येतं ! चल ! दे टाकून हा देह !

मेरी—माझा आत्मा मी तुझ्या ताब्यांत देतें ! [शॉन मेरीजवळ जातो]

शॉन—मेरी ! मेरी ! लाडके ! मला सोडून जाऊं नकोस ! तूं तिच्याबरोबर गेलीस, तर माझ्या आयुष्याचा किती चुथडा होईल ! त्या दिवसाची आठवण कर ! मी तुला त्या विहिरीजवळ भेटलों, तुझा हात हातांत घेऊन माझ्या प्रेमाचा उच्चार केला ! मेरी ! मला सोडून जाऊं नकोस ! मेरी !

मेरी—किती आवडतो मला तुझा चेहरा ! तुझा आवाज देखील मला आवडतो !

मुलगी—चल ! चल !

मेरी—हिच्या जगावर माझं खरं प्रेम आहे. तरीहि—तरीहि मला शक्य असतं, तर मी गेलें नसतें !

[मेरी असहाय्यपणें शॉनच्या बाहूंचा आधार घेतें.]

मुलगी [दारांतून]—पांढऱ्या पक्षा ! चिमुकल्या पांढऱ्या पक्षा ! ये चल !

मेरी—ती माझ्या आत्म्याला हाक मारते आहे !

मुलगी—ये ! पांढऱ्या पक्षा ! चल !

मेरी—मला गाणीं आणि नाचणाऱ्या चिमुकल्या पावलांचा आवाज ऐकूं येतो आहे !

शॉन—जाऊं नकोस ! माझ्याजवळ रहा !

मुलगी—चिमुकल्या पक्षा ! डोक्यावर सोनेरी तुरा असलेल्या पांढऱ्या पक्षा ! चल !

मेरी—[अगदी हळू आवाजांत] तरीहि—आणि—तरीहि—

मुलगी—चांदीचे पाय असलेल्या पक्षा ! चल ! चल ! ये !

शॉन—संपलं !! देह इथ टाकून आत्मा गेला !

फादर हार्ट—असं होतं ! किती तरी वेळां असं होतं ! आपला बळी जवळ जवळ प्रभूच्या हातांतून देखील दुष्ट शक्ति अलगद उचलून नेतात ! ह्या दुष्ट शक्ति दिवसेंदिवस प्रबलतर होतात; समाजाने आखून दिलेल्या मार्गानें जाण्याचें स्त्री-पुरुष नाकारतात, कारण अहंकार त्यांच्या हृदयाचें दार ठोठावतो ! कारण स्वार्थी अहंकार आपल्या कृश व दीर्घ बोटांनी त्यांना खुणावतो !!

[बाहेरून गाणें ऐकूं येतें. हें गाणें पूर्वीचेंच ' पूर्वदिशेतुन आला वारा ' हें आहे ! मात्र या वेळीं तें गाणें विजयी स्वरांत असतें व हळूहळू अनेक आवाज तें म्हणायला लागतात ! त्यांतील कांही आवाज खोलींतूनच येतात.]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

महात्माजींचा प्रथम श्राद्धदिन

गेल्या ३० जानेवारीला महात्मा गांधी यांचा प्रथम श्राद्धदिन हिंदुस्थानभर गंभीरतेने पाळण्यांत आला. महात्माजींचा श्राद्धदिन यापुढे दरवर्षी पाळण्यांत येईल. त्याचप्रमाणें, त्यांचीं ठिकठिकाणी लहानमोठीं स्मारकेंहि उभारलीं जातील. परंतु त्या महामानवाचें खरें स्मारक उभारण्याचा एकच उपाय आहे व तो म्हणजे जातीयता नष्ट करणें हा होय ! रा. किशोरीलाल मश्रूवाला यांनी म्हटल्याप्रमाणें, जातीयता आमच्या रोमरोमांत भिनली आहे व ती नाहींशी करणें ही सोपी गोष्ट नाही ! परंतु म्हणूनच या गोष्टीवर विशेष भर द्यावयास पाहिजे ! हिंदुहिंदूंतील जातिभेद-मूलक भेदभाव तर नष्ट केलाच पाहिजे, पण हिंदु, मुसलमान--वगैरे भिन्नधर्मीयांतील भेदभावहि नाहीसा करावयास पाहिजे ! हें कार्य चुकटीसरसें होणारें नाहीं. त्याला दीर्घ कालावधि लोटावयास पाहिजे व त्यासाठी अनेकांची कार्यशक्ति खर्च व्हावयास पाहिजे. ज्या जातीयतेने त्या युगपुरुषाचा अमानुषतेने बळी घेतला, तिला मूठमाती देण्यानेच त्याचें खरेंखुरें स्मारक होणार आहे !

वर्णद्वेषाचा वणवा

जातीयतेचें वडील भावंड म्हणजे वर्णद्वेष ! या वर्णद्वेषाच्या वणव्यांत दरबान येथे गेल्या महिन्यांत शेकडो हिंदी लोक भस्मसात् झाले ! आफ्रिकेंतील गोऱ्या लोकांनी वर्णद्वेषाची भावना चेतविली खरी; पण त्यांची शहामत अशी की, कील संहार त्यांनी रानटी झुलू लोकांकडून करविला व ते स्वतः मात्र नामानिराळे राहिले ! आफ्रिकेंतील हिंदी रहिवाशांवर अलीकडे जे अनर्थ कोसळत आहेत, त्यांवर या भीषण अत्याचारांनी कळस चढविला !! अशा प्रकारांची पुनरावृत्ति न होण्या-साठी हिंद सरकार कोणतें उपाय योजतें, इकडे सर्वांचें लक्ष्य लागलें आहे.

वर्णद्वेषाची भावना आटोक्यांत न राहिल्यास मानवजातीच्या नशीबीं वर्ण-द्वेषावर आधारलेलें एखादें अति भयानक महायुद्ध नक्की ठेवलेलें आहे !

‘ ज्ञानप्रकाश ’ चें अभिनंदन

पुण्याचें प्रसिद्ध दैनिक ‘ ज्ञानप्रकाश ’ हें जन्माला येऊन चालू महिन्यांत शंभर वर्षें होतात. त्याचा प्रथम अंक १२ फेब्रु. १८४९ रोजीं निघाला, तेव्हा तें साप्ताहिक होतें. कै. कृ. ग. लिमये यांच्या संपादकीय कारकीर्दींत ‘ ज्ञानप्रकाश ’ दैनिक लोकप्रियतेच्या शिखरावर होतें ! सध्याचें संपादक रा. गोखले यांच्या कार-कीर्दीत तें तेव्हाची लोकप्रियता संपादन करील, अशी आशा आहे.

‘ ज्ञानप्रकाश ’ पत्र चिरंजीवि होवो, हीच या प्रसंगीं हार्दिक इच्छा आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी
सरचिटणीस,
वि. सा. संघ यांजकडून

नवीन निवडणुकीचा निकाल

गेल्या अंकांत जाहीर केल्याप्रमाणे ता. ५-२-४९ पर्यंत नवीन निवडणुकीकरिता मतनोन्दणी झाली. सुमारें १७५ सभासदांनीं मतपत्रिका भरून पाठविल्या. मतमोजणी ता. ७-२-४९ रोजीं झाली. मतानुक्रमें निवडून आलेल्या सर्व उमेदवारांकडे संमती· करिता पत्रें रवाना झालीं आहेत. सर्वांकडून संमति हातीं पडतांच, अध्यक्षासह कार्य· कारी मंडळाच्या सर्व सभासदांचीं नांवें वृत्तपत्रांतून जाहीर करण्यांत येतील. हा निकाल ता. २०-२-४९ पर्यंत जाहीर होईल अशी अपेक्षा आहे.·

अधिकार–प्रदानाचा कार्यक्रम

येत्या ता. ६-३-४९ (अथवा ता. १३-३-४९ ला) अमरावतीला विदर्भ साहित्य संघाच्या जुन्या व नव्या कार्यकारी मंडळाची जोड सभा बोलावण्यांत येईल. त्याच दिवशीं एक साधारण सभाहि बोलावण्यांत येईल. या सभांत वार्षिक अहवाल–जमाखर्च इत्यादि नियोजित विषयांवर निर्णय घेण्यांत येतील. याच सभेंत जुने अध्यक्ष नवीन अध्यक्षास अधिकार–प्रदान करतील. कार्यकारी मंडळाच्या सभेची व साधारण सभेची सूचना रीतसर सर्व सभासदांकडे व्यक्तिशः पाठविण्यांत येईलच.

वर्गणी पाठवा

१९४८ करिता प्रसिद्ध झालेल्या सभासदांच्या यादींतील सभासदांकडून, १९४९ करिता वर्गणी मध्यवर्ती कार्यालयाकडे जमा व्हावयाची आहे. तरी सर्व सभासदांनी मार्च महिन्याअखेर आपापली वर्गणी मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी. मार्च महिन्यांत होणाऱ्या साधारण सभेनंतर नवीन वर्षाची वर्गणी न पाठविणाऱ्या बाकीदार सभासदांना मताधिकार राहणार नाही. सभासदांच्या यादींतील 'ब' विभागांतील सभासदांकडून १९४९ ची वर्गणी जमा होतांच, त्यांचीं नांवें 'अ' विभागांत समाविष्ट होतील. आणि, मग येत्या डिसेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभें राहण्याचा अधिकार प्राप्त होईल.

परीक्षा समितीचे संचालक डॉ. वि. भि. कोलते

विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षा समितीचे आतापर्यंतचे संचालक प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी अनेक अपरिहार्य कारणांमुळे परीक्षा समितीच्या संचालकत्वाचा जो राजीनामा दिला. तो गोन्दिया येथील कार्यकारी मंडळाच्या सभेने खेदाने मंजूर केला. आता यापुढे डॉ. वि. भि. कोलते यांनी कार्यकारी मंडळाच्या विनंतीवरून, विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यांत येणाऱ्या परीक्षांची सर्व जबाबदारी स्वीकारली आहे. तरी परीक्षांसंबंधीचा सर्व नवीन पत्रव्यवहार आता यापुढे 'डॉ. वि. भि. कोलते, ७१ वेस्ट सेंट्रल रोड, धंतोली, नागपूर' या पत्त्यावर करावा. जानेवारीमध्ये नुकत्याच झालेल्या परीक्षांबाबत मात्र प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्याकडेच विचारणा करावी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आगरकर-चरित्र-ग्रंथ-पारितोपिक

वर्धेचे रा. रिषभदास रांका यांनी 'आगरकर चरित्रा' साठी, पारितोषिक म्हणून रु. ५०० चा निधि वि. सा. संघाच्या स्वाधीन केला आहे. या कार्यासाठी नेमलेल्या उपसमितीने खटपट करूनहि, प्रस्तुत ग्रंथ लिहून घेण्याचें कार्य नियोजित लेखकांकडून होऊं शकलें नाहीं. म्हणून डॉ. माधव गोपाळ देशमुख यांच्यावर वरील ग्रंथ लिहून पूर्ण करण्याचें कार्य का. मं. च्या गोंन्दिया येथील सभेने सोपविलें असून, त्यांनीहि याबाबत आपली संमति दिली आहे. डॉ. माधव गोपाळ देशमुख यांचा हा 'आगरकर चरित्रा' वरील ग्रंथ येत्या वि. सा. संमेलनापर्यंत तयार होईल अशी अपेक्षा आहे.

●

वार्तापत्र —: औद्योगिक वृत्त-विशेष :— क्रमांक १४

—: पॅरॅमाउट पब्लिसिटी सिंडिकेट लि., पुणें २ तर्फे प्रकाशित. :—

सातारा टेक्स्टाइल मिल्स लि. (केशवनगर, सातारा) या ५० लक्ष रु. भांडवलाच्या सुताच्या गिरणीस १२००० चात्यांची परवानगी सरकाराकडून मिळाली आहे. कंपनीने वीस लक्ष रु. मशीनरीची आर्डर दिली आहे.

नागलकोट सिमेंट कं. लि. (कचेरी इंडस्ट्रिअल ॲशुरन्स बिल्डिंग्ज, चर्चगेट स्ट्रीट, मुंबई,) ही एक कोट रु. अधिकृत भांडवलाची कंपनी नागलकोट येथें सिमेंटचा कारखाना काढणार आहे. कंपनीच्या संचालक मंडळावर मुंबई सरकारतर्फे तीन डायरेक्टर्स असून शेठ तुलसीदास किलाचंद हे कंपनीचे पहिले डायरेक्टर आहेत.

'बँक ऑफ महाराष्ट्र लि.' (पुणें २) या महाराष्ट्राच्या अग्रेसर बँकेस १९४८ सालांत रु. २ लक्ष ५ हजारापेक्षां अधिक निव्वळ नफा झालेला आहे. बँकेची उत्तरोत्तर प्रगति होत असून वरील नफ्याची रक्कम मागील वर्षापेक्षां जास्त आहे. सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलेल्या बँकेच्या भांडवलाचें प्रमाणही आतां वाढलें आहे. बँकेनें म. गांधी स्मारक निधीस रु. ७५०० देणगी दिली. बँकेचे व्हाइस चेअरमन श्री. वा. पुं. वर्दे यांची नेमणूक रिझर्व्ह बँकेच्या मुंबई बोर्डावर झाली आहे, हेंही तिला भूषणावह आहे.

हिंदुस्थानांत पहिली सायकल आल्याला चाळीस वर्षे झालीं. रहाणीचें मान खेतांचें असलेल्या येथील लक्षावधी जनतेंत हें वाहन कमी खर्चाचें व सोईस्कर झाल्यास नवल नाहीं. सध्यां सालीना सुमारें ३ लक्ष नवीन सायकलींना जनतेंत मागणी आहे. सध्यां दोन कारखाने हिंदुस्थानांत सायकलीचे उत्पादन करीत आहेत व म्हैसूर संस्थानांत तिसरा कारखाना काढण्याची तयारी चालू आहे. हिंद सायकल्स लि. (मुंबई) या कारखान्यानें गत वर्षी ४७००० सायकली बनवल्या व चालू वर्षांत त्याचें उत्पादन आणखी ७००० सायकलींनीं वाढणार आहे. सायकलीस लागणारें विशिष्ट प्रकारचें पोलाद व इतर कच्चा माल भरपूर प्रमाणांत मिळेल तर देशांत चांगल्या दर्जाच्या सायकलींचें इष्ट तेवढें उत्पादन होऊन हिंदुस्थान या बाबतींत परावलंबी राहणार नाहीं.

दी लोकमान्य मिल्स, लि. (बार्शी) या गिरणीस ३५०० नवीन चात्या घेण्यास सरकारकडून परवानगी मिळाली असून गिरणीनें ९ लाख रु. किंमतीच्या मशीनरीची ऑर्डर दिली आहे. या गिरणीनें सोळा लाख रु. चे नवीन शेअर भांडवल विक्रीस काढलें आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl I A अन्वयें 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजुरी दिली आहे.

सांगली येथे मराठी पत्रकार परिषदेस आलेल्या प्रतिनिधींनी विश्रामबाग येथील न्यू इंजिनिअरिंग कॉलेजला, भेट दिली. अवघ्या सत्तावीस महिन्यामध्ये कॉलेजच्या चालकांनी "जंगलांत" 'मंगल' निर्माण केलें याबद्दल पाहुण्यांनी त्यांचें अभिनंदन केलें. महाराष्ट्र एज्यु. सोसायटीचे चिटणीस श्री. धोंडूमामा साठे, प्रिं. गोखले प्रभृतींनी ही मोठी धुरा शिरावर घेतली असून पुणें विद्यापीठाच्या पंखाखाली पुढे या विद्यालयाचें भवितव्य उज्वल दिसतें.

शेतकी विषयक मालांच्या खंडोबाची पाल येथे भरलेल्या प्रदर्शनांत मॉडर्न इंडस्ट्रीज लि. (उद्यमनगर, कराड) या कारखान्याचा नांगर, सेन्ट्रिफ्यूगल पंप इ. मालास पहिल्या नंबरचें शिफारसपत्र मिळालें.

ग्रामोद्योग प्रचीति, लि. (छात्रालय, अहमदनगर) पेंडपासून खाद्य पदार्थ, हातकागद इत्यादि ग्रामोद्योग करण्यासाठी ही कंपनी स्थापन झाली असून तिची शेअरविक्री चालू आहे.

सावणाच्या महर्गतेच्या कालांत डॅनिश ॲटोमायझिंग प्रॅक्टसद्वारें सावणाच्या रसायनांची पूड करून ती वरीचशी स्वस्तांत बाजारांत आणण्याची योजना अमलांत येत आहे. मुंबईवरील यंत्राची उभारणी झाली असून श्री. करंदीकर हे १० लाख रु. मालाचे उत्पादनाची कल्पना सत्यसृष्टींत आणणार आहेत.

विजापूर येथें रामजी देवजी ऑईल मिलच्या आवारांत कर्नाटक टिन फॅक्टरीच्या इमारतीच्या पायाचा दगड उद्योगमंत्रि ना. तपासे यांच्या हस्तें नुकताच बसविण्यांत आला.

बंगलोरमध्यें निघावयाचा प्लॅस्टिक कारखान्यासाठीं अवाढव्य मशीनरी बर्कशायर येथील कारखान्यांत तयार झाली असून त्यासाठीं ९ लक्ष रु. खर्ची पडले आहेत. ही यंत्रसामुग्री लवकरच हिंदुस्थानकडे रवाना होईल

आस्ट्रेलियांत कागद बनविण्यास युकॅलिप्टस झाडाच्या लाकडाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊं लागला आहे. सध्यां या देशांत कागदाच्या १२ गिरण्या असून लाकडाच्या लगद्याचें उत्पादन आठ वर्षांत ६००० टनापासून ८९००० टनापर्यंत गेलें आहे.

कोल्हापूर येथें नुकतांच ट्रकमालक-दलालसंघ स्थापन झाला असून त्याची घटना व नियम तयार करण्यांत येत आहेत.

गतवर्षी अमेरिकेंत ३० लक्ष नवीन टेलिफोन बसविण्यांत आले. त्या देशांत चालू टेलिफोनची संख्या आतां ३ कोट ८० लाखांवर गेली आहे. म्हणजे आतां चार अमेरिकनांत मिळून एक टेलिफोन असें सरासरी प्रमाण बसतें. जगांत एकूण ६ कोटी ६ लक्ष टेलिफोन यंत्रें कार्य करीत आहेत. टेलिफोनचा शोध लागून ७५ वर्षे झाली एवढ्या अवधींत ही प्रगति !

द. [illegible] येथील इंजिनिअरिंग रिसर्च लॅबोरेटरीजनें धूर होऊं न देणारा एक चुल्हा शोधून काढला [illegible] राजू यांना या शोधाचें श्रेय मिळत आहे.

[illegible] उत्तरेस दोन मैलांवर विक्टोरिया हिल्स या टेकडयांत कच्चे लोखंड चांगल्या प्रमाणांत मिळतें असा शोध नुकतांच लागला असून तेथें खाण काढल्यास द. हिन्दुस्थानच्या औद्योगिक प्रगतीस मोठेंच सहाय्य होईल.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९ । ४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका